


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक ६२ • सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com











# आमदार संतोष बांगर यांचे दिमाखात आगमन!

## भाविकांच्या जयघोषात जल्लोषात स्वागत !

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अकोला :** अकोल्याच्या ऐतिहासिक पालखी व कावड यात्रेच्या पावन पर्वावर ‘ आर आर सी समुह ’च्या भव्य मंचावर शिवसेना नेता आणि शिवभक्त कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे धडाडीचे आमदार संतोष बांगर यांचे दिमाखात आगमन झाले. श्री राजराजेश्वर महाराजांच्या जयघोषात आणि हजारो भाविकांच्या उत्साही वातावरणात त्यांचे अत्यंत जल्लोषात स्वागत करण्यात आले. आ. बांगर यांनी आर आर सी न्यूज विदर्भात बेस्ट असल्याचे शिक्कामोर्तब केले. त्यांनी आमच्या ही बातम्या विदर्भात दाखवा असे म्हणत आर आर सी च्या वाढत्या नेटवर्कचा प्रभावाची स्तुती केली. यावेळी हिंगोली युवासेना जिल्हा प्रमुख रामभाऊ कदम आणि बांगर यांचे समर्थक हजारोंच्या संख्येत उपस्थित होते. आ.संतोष बांगर, रामभाऊ कदम यांनी आज राजराजेश्वर मंदिरात शिवआराधना केली. त्याच बरोबर त्यांनी अकोल्याच्या भव्य दिव्य कावड उत्सवाची मुक्त कंठाने प्रशंसा केली.याप्रसंगी आर आर सी समूहाचे संस्थापक तथा मार्गदर्शक प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख यांनी आमदार संतोष बांगर यांचे मंचावर सहर्ष स्वागत केले. त्यानंतर आर आर सी समूहाचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख, चिन्मय देशमुख यांच्या हस्ते आमदार बांगर यांचा शाल, श्रीफळ आणि भव्य हार अर्पण करून विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी आ.बांगर यांनी बंडूभाऊ देशमुख यांचे आशिर्वाद घेत आर आर सी न्यूज ने आमच्या पण बातम्या विदर्भात दाखवाव्यात असा आग्रह धरला. आमदार संतोष बांगर यांच्या मंचावरील उपस्थितीने उपस्थित भाविकांमध्ये एकच उत्साह पाहायला मिळाला. भक्तिमय आणि चैतन्यमय वातावरणात हा स्वागत सोहळा मोठ्या थाटात पार पडला. ऋतुराज बांगर, अजिंक्य नागरे , चेतन नागरे, अजय मुंडे , वसीम शेख , हर्षद जोंडले , कपिल खंडेलवाल ,गोपाल बांगर, बालाजी बांगर , विकी चौधरी , साई घुगे, निखिल पुरी आदींची उपस्थिती होती.

### 'अकोल्याचा कावड महोत्सव अप्रतिम !' : आमदार संतोष बांगर

सत्कारानंतर बोलताना आमदार संतोष बांगर यांनी अकोल्यातील या ऐतिहासिक पालखी व कावड महोत्सवाच्या भव्यतेची मुक्तकंठाने प्रशंसा केली. 'शिवभक्तीने न्हाऊन निघालेला अकोल्याचा हा कावड महोत्सव खरोखरच अप्रतिम आणि डोळ्यांचे पारणे फेडणारा आहे,' अशा शब्दांत त्यांनी आपली दाद दिली. तसेच, गेल्या २५ वर्षांपासून आर आर सी समुहाच्या अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे यशस्वी आयोजन करणाऱ्या आर आर सी समुह च्या संपूर्ण टीमचे त्यांनी मनापासून कौतुक केले. आर आर सी न्यूजच्या थेट प्रसारणाचे कौतुक त्यांनी केले.

## 25 वर्षांची देदीप्यमान परंपरा

# आर आर सी नेटवर्कतर्फे श्री राजराजेश्वर पालखीचे स्वागत !



प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**अकोला :** अकोल्याचे ग्रामदैवत, अथांग श्रद्धेचे स्थान असलेल्या श्री क्षेत्र राजराजेश्वर महाराजांच्या पालखीचे यंदाच्या पालखी सोहळ्यातही अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गेली २५ वर्षे अकोलेकरांच्या सेवेत अखंड कार्यरत असलेल्या 'आर आर सी नेटवर्क'तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही हे भक्तिमय स्वागत श्री राजेश्वराच्या जयघोषात पार पडले. २५ वर्षांच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीचे औचित्य साधून या सोहळ्याला विशेष धार्मिक व भक्तीमय अधिष्ठान लाभले होते.

२५ वर्षांची अखंड सेवा आणि आराध्य दैवतावरील असीम श्रद्धा यांचा सुरेख संगम या स्वागत सोहळ्याच्या निमित्ताने अकोलेकरांना अनुभवायला मिळाला. आर आर सी नेटवर्कचे संस्थापक संचालक श्री प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख तसेच कार्यकारी संचालक पंकज देशमुख, चि. आर्यमन देशमुख, चिन्मय देशमुख, हितेश अग्रवाल, रोहित बलोदे यांनी आपल्या भगवान राजराजेश्वराच्या पालखीचे मनोभावे पूजन करून दर्शन घेतले. २५ वर्षांच्या या प्रदीर्घ प्रवासात श्री राजराजेश्वराचा आशीर्वादच आर आर सी नेटवर्कच्या पाठीशी सदैव पाठीराखा म्हणून उभा राहिला, अशी भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आली. या पावन प्रसंगी 'श्री राजराजेश्वर महाराज पालखी मंडळा'चे प्रमुख पदाधिकाऱ्यांचे आर आर सी च्या भव्य मंचावर शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण स्वागत करण्यात आले. 'हर हर महादेव' आणि 'श्री राजराजेश्वर महाराज की जय' या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.

या सोहळ्याला मंचावर पंडीत सुदर्शन शर्मा, प्रसाद पिसोळकर,दिलीप पुंड, जयेश घाटोळ, राजेश निखाडे, नेहा पाटील, अजिंक्य देशमुख, पुनम सोनोने, आर जे श्री,सागर गोळे, विजय घनमोडे, मो. साजिद, योगेश महाजन आणि त्यांच्या टिम यांच्यासह आर आर सी नेटवर्कचा संपूर्ण कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



कावड महोत्सवानिमित्त अकोल्याचे आराध्य दैवत भगवान राजराजेश्वर यांना जलाभिषेक करताना पालकमंत्री आकाश फुंडकर त्याचबरोबर आमदार रणधिर सावरकर. विजय अग्रवाल महापौर आदींची उपस्थिती होती

# कावड महोत्सवात लिनेस क्लबचे सामाजिक कार्य

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



अकोला: अकोल्यातील प्रसिद्ध कावड महोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणात लिनेस क्लबच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले. महोत्सवादरम्यान लिनेस क्लबच्या प्रांताध्यक्षा लि. कल्पना देशमुख आणि जिल्हाध्यक्षा राजेश्री समणपुरे यांनी 'आरआरसी''च्या मुख्य मंचाला सदिच्छा भेट दिली. आरआरसी मंचावर उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी लिनेस क्लबच्या मान्यवरांचे उत्साहात स्वागत केले. यावेळी प्रांताध्यक्षा कल्पना देशमुख व जिल्हाध्यक्षा राजेश्री समणपुरे यांनी अकोल्यातील या भव्य कावड यात्रेच्या उत्कृष्ट आयोजनाचे भरभरून कौतुक केले तसेच उपस्थित भाविकांना व शिवभक्तांना पवित्र श्रावणी उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. कावड महोत्सवाच्या निमित्ताने शहरात विविध क्षेत्रांतील सामाजिक, धार्मिक व राजकीय मान्यवरांची आरआरसी मंचावर मोठी उपस्थिती पाहायला मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे अकोल्यातील सामाजिक एकता, संस्कृती आणि जनसेवेच्या उपक्रमांना मोठे प्रोत्साहन मिळत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. प्रसंगी आरआरसी समूहाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कावड यात्रेत सहभागी झालेले हजारो शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## »थोडक्यात

### ..तर १० मिनिटात महाराष्ट्र बंद झाला पाहिजे!

छ. संभाजीनगर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज दहावा दिवस आहे. सरकार जाणूनबुजून हयगय आणि हलगर्जीपणा करत असल्याचा आरोप करत जरांगे यांनी मराठा समाजाचा रोष वाढत असल्याचं म्हटलं आहे. तसेच, सरकारला १२ तारखेपर्यंतचा वेळ दिला असून त्या दिवशी सर्व मराठ्यांनी अंतरवाली सराटीमध्ये यावं, असं आवाहन त्यांनी केलं आहे. मुंबईत एका जरी तरुणाचं रक्त निघाले तर १० मिनिटात महाराष्ट्र बंद झाला पाहिजे, असे म्हणत त्यांनी सरकारला थेट इशारा दिलाय. मनोज जरांगे म्हणाले की, ‘सरकार जाणून बुजून हयगय, हलगर्जीपणा करत आहे. मराठ्यांचा रोष वाढत आहे. मराठा संपवण्यासाठी जाणूनबुजून हलगर्जीपणा चालला आहे.







सिटी न्यूज सुपरफास्ट
संमिश्र २
सोमवार, दि. ७सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# समाधान इंगळे यांचा 'महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटर' उपक्रमातील योगदानाबद्दल सन्मान



प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**मुर्तीजापूर :** समाधान लक्ष्मणराव इंगळे यांच्या सामाजिक कार्याची शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने दखल घेतली आहे. जलसंधारणाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना 'जलदूत' म्हणून गौरविण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत राज्याचे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जलसंधारण दिनाचे औचित्य साधून 'महा वॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर' या राज्यव्यापी जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात समाधान इंगळे यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून जलसंधारण, पाणी बचत आणि जलयुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेबाबत जनजागृती करण्यासाठी योगदान दिले. या उल्लेखनीय सहभागाची दखल घेत मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने समाधान लक्ष्मणराव इंगळे यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विभागाचे सचिव श्री. जितेंद्र पापळकर यांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेल्या या प्रमाणपत्रात त्यांच्या सहभागाचा गौरव करत त्यांना 'जलदूत' म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. पत्रकारितेसोबत सामाजिक बांधिलकी समाधान इंगळे हे केवळ पत्रकार म्हणूनच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपणारे कार्यकर्ते म्हणूनही सातत्याने विविध उपक्रमांमध्ये सक्रिय असतात.

महाराष्ट्र शासनाकडून मिळालेला 'जलदूत' हा सन्मान समाधान इंगळे यांच्या सामाजिक कार्याला मिळालेली पावती आहे.

## हातरूण परिसारात खरीप पिके संकटात

**बाळापूर:** तालुक्यासह हातरूण परिसरात पावसाने अनेक दिसा पासुन दडी मारल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले आहे. पावसाअभावी सोयाबीन पिकाची वाढ खुंटली असून अनेक शेतांमध्ये सोयाबीनला अद्याप अपेक्षित फुलोरा आलेला नाही. तर कपाशीची पिकेही पाण्याअभावी माना टाकताना दिसत आहेत. मोठ्या खर्चाने पेरणी केलेल्या शेतकऱ्यांच्या उत्पादनावर आता पावसाच्या अनिश्चिततेचे सावट आहे. आणखी काही दिवस दमदार पाऊस न झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांचा एकरी खर्च देखील निघत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना आता दमदार पावसाची प्रतीक्षा आहे प्रशासनाने पिकांची पाहणी करून तातडीने मदत करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी.

### मैं बे कसूर हुं जजसाब असे वक्तव्य सोशल मीडियावर व्हायरल

# माजी प्राध्यापक भोपळे अडकले दंगलीच्या गुन्ह्यात...

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**हिवरखेड:** नगरपरिषद मध्ये मासिक सभेत मोठा राडा झाला. यावरून भाजप शिवसेना गटा विरुद्ध परस्पर गुन्हे दाखल झाले. परंतु यामध्ये माजी प्राध्यापक श्यामशीळ भोपळे यांची भूमिका निर्दोष असल्याचे ते सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेला सांगत आहेत. मै बेकसूर हूं जज साहब अशा आशयाचा त्यांचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. अभिनेते दिलीप कुमार यांचा संवाद त्यात आहे. नागरिक मात्र त्यांनी काँग्रेस सोडून शिवसेना



का निवडली हाच प्रश्न रेटून धरत आहेत. झालेल्या राड्यात आपण तर फक्त सावरा सावरीची भूमिका पार पाडली. मग भाजप पक्षाच्या दुतोंडे गटाने आपले नांव दंगलीच्या गुन्ह्यात का दिले? असा सवाल उपस्थित करून त्यांनी हा विषय चाहत्यां समोर मांडला.

तरीही मात्र त्यांचे चाहते त्यांनी काँग्रेस सोडून शिवसेनेत आपली सत्ता स्थापन केली याबाबत उलट सुलट चर्चा करीत आहेत. हे सर्व प्रकरण कोर्टाच्या कचेरीत जमा असून मात्र कशा प्रकारे न्याय कोण्या गटाला मिळतो व श्यामशील भोपळे हे या कोर्ट कचेऱ्यातून निर्दोष बाहेर पडतात का याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# कुंदन जाधव मृत्यू प्रकरण तापलं,पत्रकारांवर गुन्हे दाखल करा

प्रतिनिधी ६ सप्टेंबर

अकोला. कुंदन जाधव यांच्या मृत्यू प्रकरणात ज्या पत्रकारांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करावे अशी मागणी गौर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.संदेश चव्हाण यांनी केली आहे.

अकोल्यातील टीव्ही १८ चे प्रतिनिधी कुंदन जाधव यांच्या मृत्यू प्रकरणाने आता गंभीर वळण घेतलं आहे. पत्रकारिता क्षेत्रातील काही व्यक्तींच्या त्रासाला कंटाळून कुंदन जाधव यांचा मृत्यू झाला, असा गंभीर




आरोप गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.संदेश चव्हाण यांनी केला आहे. कुंदन जाधव यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या संबंधित पत्रकारांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत, या मागणीसाठी आज बंजारा समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी थेट अकोल्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांची भेट घेतली.कुंदन जाधव यांच्या पत्नीने यापूर्वीच संबंधित पत्रकारांविरोधात अकोल्यातील खदान पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून गुन्हा नोंदविण्याची मागणी केली होती. मात्र, या प्रकरणात पोलिसांकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप करत समाजबांधवांनी संताप व्यक्त केला आहे.आज पोलीस अधीक्षकांच्या भेटीसाठी स्वर्गीय कुंदन जाधव यांच्या पत्नी आणि त्यांची मुलगीही उपस्थित होत्या. पतीच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या व्यक्तींवर कारवाई करून न्याय द्यावा, अशी आर्त मागणी यावेळी कुंदन जाधव यांच्या पत्नीने केली. आठ दिवसांच्या आत संबंधितांवर गुन्हे दाखल झाले नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# कृष्ण जन्माष्टमी व शिक्षक दिन उत्साहात साजरा




प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**हातरुण:** जिल्हा परिषद उर्दु व मराठी शाळा येथे कृष्ण जन्माष्टमी व शिक्षक दिनाचा कार्यक्रम विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष होते.

यावेळी मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमात इयत्ता पहिली ते आठविच्या विद्यार्थिनींनी सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा उत्स्फूर्त सहभाग, श्रीकृष्ण जन्माष्टमीचा आनंद सर्वांनी एकत्रितपणे साजरा केला. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक शेख इनायतुल लाह व जिल्हा परिषद मराठी शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र कुळकर्णी यांच्या नेतृत्वात शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# शिक्षक दिनी शिक्षकांचा हृद्य सत्कार सोहळा

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अकोला:** प्रबुद्ध भारत एज्युकेशन सोसायटी,अकोला या शासनमान्य अल्पसंख्याक संस्थेद्वारे संचालीत गाडगे महाराज विद्यालय, व नागसेन प्राथमिक शाळा, खरप रोड अकोला येथे शिक्षक दिनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सुरेश रा शिरसाट हे होते.

यावेळी शाळेत विद्यार्थ्यांचे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. असाच एक कार्यक्रम म्हणजे स्वयंशासन. यात अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी होत मुख्याध्यापक,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे कार्य करत अध्यापन व प्रासंगिक कार्यात सहभाग घेतला. शेवटी संस्थेचे अध्यक्ष सुरेश शिरसाट यांच्या हस्ते सदर दोन्ही शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचा शाल,हार व श्रीफळ देऊन हृदय सत्कार




करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी, शाळेतील शिक्षकांचे भाषणे झालीत. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश शिरसाट यांनी मार्गदर्शन केले. सुरेश शिरसाट यांनी आपले अध्यक्षीय भाषण करताना सांगितले की, शिक्षक केवळ एक विद्यार्थी घडवत नाहीत तर एक चांगला सभ्य समाज व देश घडवत असतात. त्यामुळे शिक्षक हे आदर्शस्थानी असतात. " कार्यक्रमास दोन्ही शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक हातोले ,विनोद गवई, संजीव घुगे, योगेश ढगे, मनिष उनवणे, संतोष इंगळे, बोदडे, गायकवाड ,प्रदिप पाचपोर, घाडगे, बोचे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नागले यांनी, प्रास्ताविक हातोले यांनी तर आभारप्रदर्शन विनोद गवई यांनी केले.

# खेडकर नगरात विविध कार्यक्रमांनी साजरा झाला श्रीकृष्ण जन्मोत्सव

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**मूर्तिजापूर :** स्थानिक खेडकर नगरातील श्रीकृष्ण मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजनासह श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात संपन्न झाला. दि. 4 रोजी रात्री 12 पर्यंत ह. भ. प. शिवहरी महाराज इस्तापे व त्यांच्या सहकाऱ्यांचे कीर्तन संपन्न झाले. याप्रसंगी संपूर्ण मंदिर दिव्यांच्या रोषणाई व हारा फुलांनी सजविण्यात आले होते. या जन्मोत्सवानिमित्त दि. 29 ऑगस्ट ते 5 सप्टेंबर पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात ह. भ. प. संतोष महाराज पिसे यांचा विठ्ठल नाम जप कार्यक्रम याशिवाय डॉ. प्रकाश वानखडे, घनश्याम सावजी, अशोकराव सकळकळे, मुरकर महाराज, यांचे कीर्तन झाले. अखेरच्या दिवशी ह. भ. प. नंदकिशोर महाराज ढेंगे यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादानंतर महोत्सवाची सांगता झाली. या महोत्सवादरम्यान विविध महिला भगिनी मंडळांचेही भजन, कीर्तनाचे कार्यक्रम संपन्न झालेत. डॉ. हेमंत मोरे यांचे हस्ते श्रीकृष्ण अभिषेक व महापूजेचा कार्यक्रम संपन्न झाला. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता श्रीकृष्ण मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष हरिदास जायले पाटील, उपाध्यक्ष दिनकर सुरसे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव जायले, सचिव दत्तात्रय लांडे, व्यवस्थापक सुधाकर गाडगे, सदस्य बाबाराव लोडम, श्रीकांत देशमुख, ओम प्रकाश पाडिया, शितूत व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रदीप खाडे, केशव आढाऊ, अनंत झांबरे, दिलीप देशमुख, सुधाकर अंबुसकर, ॲड.अक्षय खाडे, विनोद लढे, ॲड. सुधीर गाडगे, हर्षवर्धन भिसे यांचे सह प्रतिभा खाडे, सुशीला जायले, पल्लवी खाडे, आशाताई गव्हाळे, ज्योतीताई उमरीकर, साक्षी खाडे, शुभांगी देशमुख, सरला ताई लढे, स्मिता आढाऊ, संगीता झांबरे अपर्णा भिसे व परिसरातील नागरिक बहु संख्येने उपस्थित होते

# देशासाठी फाशीवर जाणारे पहिले नरवीर उमाजीराजे नाईक!

राजे उमाजी नाईक हे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढणारे महाराष्ट्रातील आद्यक्रांतिकारक आणि भारतीय स्वातंत्रलढ्यातील प्रथम सशस्त्र क्रांतीकारक मानले जातात.

भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत काहींची नोंद झाली, काहींची दखलच घेण्यात आली नाही. सन १८५७ च्या उठावाअगोदरही अनेक उठाव झाले अशाच पहिल्या उठावाद्वारे इंग्रजांना सलग १४ वर्ष सळो की पळो करून सोडणारे व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक नरवीर ठरले गेले, ते म्हणजे राजे उमाजी नाईक. क्रांतिकारकांत राजे उमाजी नाईक हे तसे उपेक्षित राहून गेले. मरावे परि क्रांतिरूपे उरावे अशी उक्ती आहे, ती नाईक यांच्याबद्दल तंतोतंत जुळते. त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वतःला रोखू शकले नाहीत. इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबर्टसन याने १८२०ला ईस्ट इंडिया कंपनीला लिहिताना म्हटले आहे, 'उमाजीचा रामोशी समाज इंग्रजांविरुद्ध तिरस्काराने पेटला असून तो कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. जनता त्यांना मदत करत असून कोणी सांगावे हा उमाजी राजा होऊन छत्रपती शिवाजीसारखे राज्य स्थापणार नाही?' तर मॅकिन्टॉश म्हणतो, 'उमाजीपुढे छत्रपती शिवरायांचा आदर्श होता. त्याला फाशी दिली नसती तर तो दुसरा शिवाजी झाला असता.' जर इंग्रजांनी कूटनीती आखली नसती तर, कदाचित तेव्हाच भारताला स्वातंत्र्य लाभले असते.

उमाजीराजे नाईक यांचा जन्म रामोशी-बेरड समाजात लक्ष्मीबाई व दादोजी नाईक खोमणे यांच्या पोटी ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील किल्ले पुरंदर येथे झाला. वडील दादोजी नाईक खोमणे पुरंदर किल्ल्याचे वतनदार होते. त्यामुळे उमाजीराजेंचे कुटुंब पुरंदर व वज्रगड किल्ल्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळेच त्यांना नाईक ही पदवी मिळाली होती. उमाजीराजे जन्मापासूनच हुशार, चंचल, शरीराने धडधाकट, उंचापुरे आणि करारी होते. त्यांनी पारंपरिक रामोशी हेर कला लवकरच आत्मसात केली. जसे उमाजीराजे मोठे होत गेले तसा त्यांनी वडील दादोजी नाईक यांच्याकडून दांडपट्टा, तलवार, भाला, कुर्‍हाडी, तीरकामठा, गोफण वगैरे चालवण्याची कला अवगत केली होती व किल्ले वज्रगड परिसरात ह्या युद्धकलांचे प्रशिक्षण दादोजी नाईक यांनी दिले. त्यामुळे राजे उमाजी नाईक यांचे गुरू त्यांचे वडीलच होते. आणि आजही राजांची तालीम वज्रगड वर इतिहासाची साक्ष देत दिमाखात उभी आहे. याच तालमीत राजांनी आपलं शरीर बळकट बनविले व ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र क्रांतीचा पहिला बंड पुकारला. म्हणूनच त्यांना पहिले आद्यक्रांतिवीर पण म्हणतात. इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन करण्यास सुरुवात केली होती. हळूहळू मराठी मुलुख जिंकत त्यांनी पुणे ताब्यात घेतले. इ.स. १८०३ मध्ये पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यास स्थानापन्न केले आणि त्याने इंग्रजांचा पाल्य म्हणून काम सुरू केले. सर्वप्रथम त्याने इतर सर्व किल्ल्यांप्रमाणे पुरंदर किल्ल्याच्या वतनदारीचे व संरक्षणाचे काम रामोशी समाजाकडून काढून घेऊन आपल्या मर्जीतील लोकांकडे दिले. त्यामुळे रामोशी समाजावर उपासमारीची वेळ आली. जनतेवर इंग्रजी अत्याचार वाढू लागले. अशा परिस्थितीत करारी उमाजीराजे बेभान झाले. छत्रपती शिवरायांना श्रद्धास्फूर्तीचे स्थान देत त्यांचा आदर्श घेऊन स्वतःच्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत माझ्या देशावर परकीयांना राज्य करू देणार नाही, असा पण करत विठोजी नाईक, कृष्ण नाईक, खुशाबा रामोशी, बापू सोळस्कर यांना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या श्री खंडोबारायाला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजांविरोधात पहिल्या बंडाची गर्जना केली.

उमाजीराजे नाईक यांनी इंग्रज, सावकार, मोठे वतनदार अशा लोकांना लुटून गोरगरिबांना आर्थिक मदत करण्यास सुरुवात केली. कोणत्याही स्त्रीवर अत्याचार अन्याय

## नरवीर उमाजी नाईक यांची आज जयंती



झाल्यास तर ते भावासारखा धावून जाऊ लागले. इंग्रजांना त्रास दिल्यामुळे उमाजीराजेंना सरकारने इ.स. १८१८मध्ये एक वर्ष तुरुंगवासाची शिक्षा दिली परंतु, तो काळ सत्कारणी लावत त्यांनी त्याकाळात तुरूंगात लिहिणे-वाचणे शिकले. या घटनेचे इंग्रज आधिकारी कॅप्टन मॅकिन्टॉश याने फार आश्चर्य व कौतुक केले आणि तुरूंगातून सुटल्यानंतर इंग्रजांविरुद्धाच्या त्यांचा कारवाया आणखी वाढल्या. उमाजीराजे देशासाठी लढत असल्याने जनताही त्यांना साथ देऊ लागली आणि इंग्रज मेटाकुटीला आले. उमाजीराजेंना पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी मॅकिन्टॉश याने सासवड-पुरंदरच्या मामलेदारास फर्मान सोडले. मामलेदार इंग्रजी सैन्य घेऊन पुरंदरच्या पश्चिमेकडील एका खेड्यात गेला असता तेथे त्यांच्यात आणि उमाजीराजेंच्या सैन्यात तुंबळ युद्ध झाले आणि इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागला. उमाजीराजेंचे सैन्य डोंगरात टोळ्या करून राहत असे. एका सैन्य तुकडीत जवळ जवळ ५ हजार सैनिक होते.

इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रुशी मुकाबला करायचा म्हणजे मोठे मनुष्यबळ असायला हवे. म्हणजेच सैन्य व प्रचंड खर्च आलाच. पण उद्देश महान असल्यामुळे ते साधनाअभावी थांबले नाहीत.ते छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श मानायचे असे खुद्द इंग्रज आधिकारी कॅप्टन मॅकिन्टॉश याने नमूद केले आहे. २४ फेब्रुवारी १८२४ला उमाजीराजेंनी भाबुड्री येथील इंग्रज खजिना लुटून तो देवळाच्या देखभालीसाठी जनतेला वाटला होता. २२ जुलै १८२६ साली आद्यक्रांतिकारक उमाजींचा राज्याभिषेक कडेपठार, जेजुरी या ठिकाणी करण्यात आला. त्यांनी छत्रचामर, अबदागीर, इ. राजचिन्हे धारण केली. दरबारात ते भिक्षुक-पुजारी यांना दक्षिणा व गोरगरिबांना दान देत असत. उमाजीराजेंनी विभागनिहाय सैन्य प्रमुख व त्यांच्या तुकड्या नेमून सर्व भागात तैनात केल्या होत्या आणि त्यांना कामे वाटून दिली होती. तसेच त्यांनी एकमेकांशी संपर्क, दळणवळण, इंग्रजांच्या बातम्या तसेच लोकांचा बातम्या, इ. कामासाठी हेरखातेही निर्माण केले होते. विभागनिहाय गुप्तहेरखाते नेमले होते. सैन्यात व गुप्तहेरखात्यात सर्व जाती-धर्माचे लोक होते.

२८ ऑक्टोबर १८२६ साली उमाजीराजेंविरुद्ध इंग्रजांनी १ला जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यात उमाजीराजे व त्यांचा साथीदारांना पकडणाऱ्यास मोठ्या रकमेची बक्षिसे व इनाम जाहिर केले व या क्रांतिकारकांना मदत करणाऱ्यास शिक्षा जाहीर केली.पण जनतेने इंग्रजांना मदत केली नाही. यातून उमाजीराजेंची लोकप्रियता दिसून येते. अशाच प्रकारे २ रा जाहिरनामा इंग्रजांनी ८ ऑगस्ट १८२७ साली प्रसिद्ध केला. त्यात बक्षिसाची रक्कम वाढवली व शरण येणाऱ्यास माफी देण्याचे अभिवचन देण्यात आले. तरीही कोणीही मदत केली नाही. कारण लोक उमाजीराजेंना इंग्रजांविरुद्ध एक आशास्थान म्हणून पाहू लागले होते. २० डिसेंबर १८२७ साली उमाजीराजे व इंग्रजांच्या झालेल्या युद्धात इंग्रजांना पराभव पत्करावा लागला. उमाजीराजेंनी ३ इंग्रज सैनिकांची मुंडकी कापून मामलेदाराकडे पाठवली. त्यामुळे इंग्रज चांगलेच धास्तावले. कॅप्टन डेव्हिसपासून ते लेफ्टनंट पर्यंत सर्वच लालबुंद झाले. ३० नोव्हेंबर १८२७ ला इंग्रजांना त्यांनी ठणकावून सांगितले की, आज हे एक बंड असले तरी असे हजारो बंडे सातपुड्यापासून सह्याद्रीपर्यंत उठतील व तुम्हास जेरीस आणतील. फक्त इशारा देऊन न थांबता त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इंग्रजांनी ३ रा जाहिरनामा उमाजीराजेंविरुद्ध प्रसिद्ध करून बक्षिसाची रक्कम दुप्पट केली. त्याचाही काही उपयोग झाला नाही. जंजिऱ्याचा सिद्दी नवाब याने उमाजीराजे कोकणात गेले असताना त्यांना मदत मागितली होती. २४ डिसेंबर १८३०ला उमाजीराजेंनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून घायाळ करून परत पाठवले होते आणि काहीचे प्राण घेतले. २६ जानेवारी १८३१ साली इंग्रजांनी ४ था जाहिरनामा प्रसिद्ध केला व त्यात उमाजीराजेंना पकडून देणाऱ्यास ५००० रुपये रोख बक्षिस व २०० बिघे (१००एकर) जमीन जाहिर करण्यात आली. पण तरीही कोणीही इंग्रजांना मदत केली नाही. अशाप्रकारे उमाजीराजेंचा भारताचा स्वातंत्र्यासाठी असणाऱ्या लढ्यास सर्व राजे-रजवाडे, संस्थानिक, जनता पाठिंबा देत होते.

उमाजीराजेंनी १६ फेब्रुवारी १८३१ रोजी इंग्रजी सत्तेविरुद्ध एक जाहीरनामाच प्रसिद्ध केला. त्यात नमूद केले होते की, 'लोकांनी इंग्रजी नोकऱ्या सोडाव्यात. सर्व राजे रजवाडे , सरदार जमीनदार, वतनदार, देशवासीयांनी एकाच वेळी एकत्र येऊन जागोजागी बंड पुकारावे आणि इंग्रजांविरुद्ध अराजकता माजवावी. इंग्रजांचे खजिने लुटावेत. इंग्रजांना शेतसारा, पट्टी देऊ नये. असे करणाऱ्यास नवीन सरकारमधून जहागिरी, इनामे वा रोख पैशाची बक्षीसे मिळतील.ज्यांची वंशपरंपरागत वतने, तनखे, इ. इंग्रज सरकारमुळे गेले असतील ती सर्व त्यांना परत केली जातील. इंग्रजांची राजवट आता लवकरच संपुष्टात येणार आहे व नवीन न्यायाधीष्ठीत राज्याची स्थापना होइल. इंग्रजांना कोणीही मदत करू नये तसे केल्यास नवीन सरकार त्यांना शासन करेल' असे सांगून उमाजीराजेंनी एकप्रकारे स्वराज्याचा पुकारच केला होता. संपूर्ण क्रांतिकारकांचा इतिहासात अशा प्रकारचा व्यापक जाहिरनामा प्रथमच दिसतो. हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पानच आहे. म्हणूनच उमाजीराजे हे आध्यक्रांतिकारक ठरतात. तेंव्हापासून उमाजी हे जनतेचे राजे बनले. या सर्व प्रकारामुळे इंग्रज गडबडले आणि त्यांनी उमाजीराजेंना पकडण्यासाठी युक्तीचा वापर केला. सावकार, वतनदार यांना मोठमोठी आमिषे दाखवण्यात आली. इंग्रजांनी उमाजीराजेंविरुद्ध ५वा जाहिरनामा प्रसिद्ध केला. माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये रोख आणि चारशे बिघे (२०० एकर) जमीन बक्षीस म्हणून देण्याची घोषणा केली. हा इनाम त्या काळात अगनित होता. उमाजीचे दोन साथीदार काळू व नाना हे बळी पडले,ते फितूर झाले व त्यांनी उमाजींराजेंची सर्व गुप्त माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उतरोली या गावी रात्री बेसावध असताना उमाजीराजेंना इंग्रजांनी पकडले. पुण्यात मामलेदार कचेरीतील एका काळ्या खोलीत त्यांना ३५ दिवस ठेवण्यात आले. अशा या खोलीत उमाजीराजे असताना त्यांना पकडणारा इंग्रज अधिकारी कॅप्टन मॅकिन्टॉश दररोज महिनाभर त्यांची माहिती घेत होता. त्यानेच उमाजीराजेंची सर्व हकीकत लिहून ठेवली आहे. उमाजीराजेंवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला आणि या नरवीर राजे उमाजी यांना न्यायाधीश जेम्स टेलर यांनी दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली. देशासाठी फाशीवर जाणारा पहिले नरवीर उमाजीराजे नाईक ३ फेब्रुवारी १८३२ला पुण्याच्या खडकमाळ आळी येथील मामलेदार कचेरीत वयाच्या ४३ व्या वर्षी हसत हसत फासावर चढले. जीवंतपणी सतत ताठ राहिलेली मान जीव गेल्यानंतरच वाकली. इतरांना दहशत बसावी म्हणून उमाजीराजेंचे प्रेत कचेरीच्या बाहेर पिंपळाच्या झाडाला तीन दिवस लटकावून ठेवले होते. उमाजीराजेंसोबत इंग्रजांनी त्यांचे साथीदार इ.स. १८७९ मध्ये सातारा येथील हरि माकजी यांना तर पुढे खुशाबा नाईक आणि बापू सोळस्कर यांनाही फाशी दिली.

# सिटी न्यूज अकोला

३

सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# अकोटमध्ये कावड-पालखी मिरवणुकीचा जल्लोष

## २४ मंडळांचा सहभाग, कडेकोट पोलीस बंदोबस्त



वि.प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अकोट :** श्रावणमासानिमित्त आयोजित भव्य कावड यात्रा व पालखी मिरवणुकीला सोमवारी सकाळी ८ वाजता उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवर हजारो शिवभक्त, कावडधारी व भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण अकोट शहर शिवमय झाले असून मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

यंदाच्या कावड-पालखी मिरवणुकीत अकोट शहरातील सुमारे २४ मंडळे सहभागी झाली असून विविध आकर्षक सजावटीच्या पालख्या, ढोल-ताशांचे गजर, हर हर महादेवच्या जयघोषात मिरवणूक पुढे सरकत आहे. अकोला नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सोनूशेठ चौक, यात्रा चौक व कालंका माता चौक या प्रमुख मार्गांवरून मिरवणूक काढण्यात येत आहे.

मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी १० पोलीस अधिकारी, ९० पोलीस अंमलदार आणि ५४ होमगार्ड जवानांचा विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहरातील काही मार्गांवर विशेष वाहतूक नियोजनही करण्यात आले असून नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मिरवणुकीच्या मार्गावर विविध सामाजिक, धार्मिक व व्यापारी संस्थांतर्फे शिवभक्तांचे स्वागत करण्यात येत आहे. ठिकठिकाणी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार होत असून यावर्षी प्रथमच किन्नर समाजातर्फेही कावड मंडळांच्या अध्यक्षांचे स्वागत करण्यात आल्याने या उपक्रमाची विशेष चर्चा रंगली आहे.

शहरभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून महादेवाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आहे. कावड-पालखी सोहळ्याच्या निमित्ताने शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण असून मोठ्या संख्येने नागरिक मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यांवर गर्दी करत आहेत. पोलीस प्रशासन, होमगार्ड आणि स्वयंसेवकांच्या मदतीने मिरवणूक शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडत आहे.

# सहायता हेल्प सपोर्ट ग्रुपतर्फे उपजिल्हा रुग्णालयात फळ व बिस्किट वाटप

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**मूर्तिजापूर :** येथील लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात 'सहायता हेल्प सपोर्ट ग्रुप'च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत भगवान श्री कृष्ण जन्माष्टमीनिमित्त रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना फळ व बिस्किटांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात लक्ष्मीबाई देशमुख यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व शेतकरी नेते दिवाकर काटे माजी सरपंच घुंगशी यांच्या ग्रुपच्या सदस्यांनी फळे व बिस्किटांचे वाटप केले. तसेच रुग्णांसोबत असलेल्या नातेवाइकांना अल्पोपहार देऊन दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

या प्रसंगी आयोजकांनी एक महत्त्वाची घोषणा केली. मूर्तिजापूर, अकोला आणि अमरावती येथील रुग्णालयांमध्ये भरती असलेल्या रुग्णांना ग्रुपतर्फे मोफत जेवणाचा डबा पुरवण्यात येईल. गरजूंनी फक्त एका फोनवर संपर्क साधावा, त्यांच्या भोजनाची योग्य व्यवस्था केली जाईल, असे आवाहन ग्रुपच्या वतीने करण्यात आले.

या प्रसंगी सहायता ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शाहिद जाकीर चाऊस, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र नेमाडे डॉ.अफ्तुरकर, डॉ. रेहान चाऊस, श्रीकृष्ण बोळे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ब्लड ग्रुपचे संस्थापक रोहित जोगी, सहायता हेल्प ग्रुपचे अकोला जिल्हाध्यक्ष रामदास हाटकर, ललित चौधरी, अमोल राऊत, रुग्ण कल्याण समितीचे सुनील लाशुवानी, समाजसेवक विष्णू लोडम, बबलू भेलोंडे, श्रीधर कांबे, नितेश गुंजाळ, मंगेश तांबडे, गजानन चव्हाण, रितेश शर्मा, भवनसुंदर वानखडे, सहायता हेल्प ग्रुपचे महिला जिल्हाध्यक्ष रूपालीताई खडसे, शहराध्यक्ष अब्दुल रईस, प्रथमेश धानोकार, महात्मा फुले ब्लड डोनर ग्रुपचे तुषार जंगले, आकाश डहाके, नितीन वर्मा, साकिब चाऊस, विकी भावनानी, विपिन ठाकूर, विजय गिरी, अन्वर खान, जीवन ज्योती ब्लड डोनर ग्रुपचे स्वप्निल जामनिक, शेख जाहीर, संतोष चौधरी यांच्यासह ग्रुपचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# वरुर जऊळकाला ऋषिपंचमी यात्रा महोत्सव व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**अकोट:** वरुर जऊळका येथील योग योगेश्वर संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समर्थ सद्गुरू संत गजानन महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त ऋषिपंचमी यात्रा महोत्सव व तुळशी-बिल्वदल अर्चन नामसंकीर्तन अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह ८ ते १५ सप्टेंबर पर्यंत चालणार आहे.या सप्ताहात दररोज पहाटे ५ ते ६ काकडा भजनाने दिवसाची सुरुवात होईल. सकाळी ८ ते १० या वेळेत विष्णुसहस्त्रनाम व शिवसहस्त्रनाम पठणासह तुळशीदल व बिल्वदल वाहण्याचा अर्चन सोहळा होईल. दुपारच्या सत्रात दुपारी २ ते ३ या वेळेत श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण होईल. सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ८ ते १० या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या हरीकीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.

कीर्तन महोत्सवात दि. ८ रोजी ह.भ.प. राम महाराज गव्हारे (सांगळूद), दि. ९ रोजी ह.भ.प. गजानन महाराज दहीकर (बुलडाणा), दि. १० रोजी ह.भ.प. नंदू महाराज ढेंगे (म्हातोडी), दि. ११ रोजी ह.भ.प. किशोर महाराज काळे (तामसी), दि. १२ रोजी ह.भ.प. राजेंद्र महाराज वसते (पाळोटी), दि. १३ रोजी ह.भ.प. अरुण महाराज लांडे (पारस), दि. १४ रोजी ह.भ.प. वासुदेव महाराज खोले गुरुजी यांची कीर्तन सेवा होईल.

ऋषिपंचमीचा मुख्य सोहळा दि.१५ सप्टेंबर रोजी होईल. त्या दिवशी सकाळी ५ ते ६ श्रींच्या मूर्तीचा अभिषेक, सकाळी ७ ते १० वरूर जऊळका संतनगरीतून श्रींच्या मुखवटा व पादुकांसह भव्य दिंडी सोहळा काढण्यात येईल. सकाळी १० ते १२ ह.भ.प. गणेश महाराज शेटे यांचे काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या संपूर्ण सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. अवधूत महाराज पारसकर हे करणार असून योग योगेश्वर संस्थान विश्वस्त मंडळ व समस्त भक्तगण मंडळी वरूर जऊळका यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

# अकोल्यात नगरसेवक आशिष पवित्रकार मित्रमंडळातर्फे भव्य दहीहंडी महोत्सव

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

## दहीहंडी फोडण्यासाठी विविध गोविंदा पथकांची उपस्थिती





**अकोला :** शहरात नगरसेवक आशिष पवित्रकार मित्रमंडळाच्या वतीने भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात दहीहंडी फोडण्यासाठी शहरातील विविध गोविंदा ग्रुप व पथकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या निमित्ताने अकोला शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत उत्साहात महोत्सवाचा आनंद घेतला.

नगरसेवक आशिष पवित्रकार यांच्या मार्फत गेल्या अनेक वर्षापासून दहीहंडीचा सोहळा आयोजित करण्यात येत आहे. त्याला दरवर्षी उदंड प्रतिसाद मिळत आहे. गोविंदा पथकांचे देखील महत्वाचे आकर्षण आशिष पवित्रकार यांची दहिहंडी ठरत आहे. भागवत सेवा समिती प्रभाग क्रमांक १३ चे सर्व पदाधिकारी यांचा सहभाग या दहिहंडी सोहळ्यात होता. संकल्प प्रतिष्ठानाचा ढोल आणि त्यावर थिरकणारी तरुणाई पाहिल्यावर प्रत्येकामध्ये उत्साह संचारत होता. सोनोने हॉस्पीटल समोर च्या ओपन स्पेस मध्ये झालेला हा सोहळा तरुणांच्या सांघिक कार्याचे यशस्वी उदाहरण ठरला. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये चुरस पाहायला मिळाली. ढोल-ताशांचा गजर, जल्लोष आणि उपस्थित नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महोत्सवाच्या आयोजनासाठी आशिष पवित्रकार मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत दहीहंडी महोत्सवाचा उत्साह द्विगुणित केला.

दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये चुरस पाहायला मिळाली. ढोल-ताशांचा गजर, जल्लोष आणि उपस्थित नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आमदार वसंत खंडेलवाल, माजी गृह राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, माजी आमदार हरिदास भदे, पागृत,काटे सर, पिसे, संजय चौधरी, मनीष मोहोड, सुभाष टाले, अंशुमन देशमुख, राहुल साबळे, स्वप्नील गावंडे, जीवनराव देशमुख, सिव्हील लाईन पोलीस स्टेशनच्या निरीक्षक मालती कायटे, एपीआय शिंदे उपस्थित होते. आरजी श्री यांनी बहारदार संचालन केले. हनुमान व्यायाम शाळा अनिकट पथकाने दहीहंडी फोडली. सुरूवातीला पिनॅकल अकादमीचे गोविंद प्रामाणिक आणि संचाने नृत्य सादर केले. नगर सेवक आशीष पवित्रकार यांनी मोमेंटो प्रदान केले. भागवत सेवा समिती, आशीष पवित्रकार मित्र मंडळ यांचा आयोजनात सहभाग होता.

# हिवरखेड तेल्हारा मार्गावर ट्रकने दिली डीव्हायडरला धडक

## सुदैवाने जिवीतहानी टळली



प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**हिवरखेड :** तेल्हारा मार्गावर रस्त्यांच्या मध्यस्थी असलेल्या डीव्हायडरला तेल्हारा कडे जाणाऱ्या ट्रंकने धडक दिली यामध्ये सुदैवी मोठी जीवितहानी टळली मात्र टँकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे समजते घटनास्थळी हिवरखेड पोलिसांनी धाव घेतली हा अपघात रोडवर झाल्याने मोठी गर्दी जमली होती पोलिसांनी मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न केला.

# कृष्ण जन्माष्टमी व शिक्षक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**आलेगाव :** जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट, आलेगाव येथे कृष्ण जन्माष्टमी व शिक्षक दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन हे होते.

शिक्षक दिनानिमित्त शाळेच्या वतीने सत्कारमूर्ती प्रल्हाद गिन्हे, श्रीकृष्ण गावंडे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मॅनेजर प्रशांत धार्मिक, सौ. कविता गावंडे, सौ. नलिनी चतारकर, श्रीकृष्ण डोंबळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक महावीर जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या निमित्ताने मटकी, पाळणा, बासरी आणि मुकुट डेकोरेशन या स्पर्धांचा समावेश होता. तसेच महिला पालकवर्गासाठी महाभारतातील कोणत्याही एका पात्राची वेशभूषा साकारणे ही विशेष स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमात इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी तसेच इयत्ता दुसरीच्या विद्यार्थिनींनी सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर नर्सरी ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी आकर्षक फॅशन शो आयोजित करण्यात आला. चिमुकल्यांच्या सुंदर वेशभूषा आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंगत निर्माण झाली.

यानंतर उत्साहाचे केंद्र ठरलेल्या दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. विशेष म्हणजे महिला पालकवर्गानेही डोळ्यांवर पट्टी बांधून दहीहंडी फोडण्याचा अनोखा आनंद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक महावीर जैन यांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये शिक्षक दिन साजरा



वि.प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अकोट:** स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी, अकोट येथे दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष लुणकरणजी डागा, सचिव प्रमोदजी चांडक, कोषाध्यक्षा रेखा चांडक तसेच संस्थेच्या सदस्या शारदा लखोटिया, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, जयश्री बिहाडे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक नितीन गावंडे, मालती महल्ले, सुचिता गायकवाड, वैशाली गावत्रे आणि पालक प्रतिनिधी रूपाली होले उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त हिमानी सिसोदिया, वंश गोरे आणि धनश्री अकोटकर यांनी गुरुजनांविषयी मनोगत व्यक्त केले. श्रेयश मानकर याने मुख्याध्यापकाची भूमिका साकारत शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. अक्षय जपसरे सर यांनी प्रेरणादायी उदाहरणांद्वारे गुरुंचे स्थान स्पष्ट केले. मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत शिक्षकांची समाजातील भूमिका विशद केली. तर संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया यांनी सुशिक्षित आणि सुसंस्कृत नागरिक घडविण्यात शिक्षकांचे योगदान अनमोल असल्याचे सांगितले.

यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांना समर्पित नाटक व नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. शिक्षकांच्या भूमिकांचे सादरीकरण करणाऱ्या स्पर्धेत गिरीजा बोन्द्रे हिने प्रथम, तनुश्री मानकर हिने द्वितीय तर शेख अरसलान याने तृतीय क्रमांक पटकावला. शाळेच्या संचालक मंडळातर्फे सर्व शिक्षकांचा भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वरूपा रेखाते, चारूल गांधी आणि आरती गावंडे यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्या वाळके, अनन्या मिसाळ, तनुश्री मानकर, स्वरांकित हिवराळे, विनित जेस्वानी आणि अन्वेशा राजगुरू यांनी केले. आराध्य थुटे व सारिका रेळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# स्पोकन इंग्लिशचे महागुरु डॉ. सागर आखरे यांना मानद डॉक्टरेट

प्रतिनिधी ७ सप्टेंबर




**मुर्तीजापूर :** आपल्या प्रभावी अध्यापनशैलीने आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाने हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला नवी दिशा देणारे, मुर्तीजापूर तालुक्यातील स्पोकन इंग्लिशचे महागुरू म्हणून नावलौकिक मिळविलेले आखरे अँड मंडलापुरे फाउंडेशनचे संस्थापक सागर सुखदेवराव आखरे यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या दीर्घकालीन व्यावसायिक अनुभव, अध्यापन कार्य तसेच सामाजिक योगदानाची विशेष दखल घेत इंटरनॅशनल अमेरिकन युनिव्हर्सिटी, लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया यांच्या वतीने त्यांना 'इंग्रजी भाषा शिक्षण आणि संप्रेषण विज्ञान' या विषयातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, या मानद डॉक्टरेटसाठी महाराष्ट्रातून एकमेव निवड डॉ. सागर आखरे यांची झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे हा सन्मान केवळ आखरे कुटुंबीयांसाठीच नव्हे, तर मुर्तीजापूर तालुका, अकोला जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरला आहे.

'शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान देणे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला पंख देणे' या भावनेतून त्यांनी आपल्या कार्याचा विस्तार केला. त्यामुळेच त्यांच्या अध्यापन कार्याला विद्यार्थ्यांसह पालक आणि समाजातूनही मोठा प्रतिसाद मिळत आला आहे.

# शिक्षक दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अकोटतर्फे शिक्षकांचा गौरव

वि.प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**अकोट :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ अकोटच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सत्कार करून त्यांच्या ज्ञानदानाच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी गजाननराव निमकर्डे, जीवनसिंग चव्हाण, पद्माकर फुलारी, छाया मानकर आणि नितीन गुहे या शिक्षकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षकांचे समाजातील योगदान अधोरेखित करताना सांगितले की, शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्यामध्ये संस्कार, शिस्त, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास रुजवून आदर्श नागरिक घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. राष्ट्राच्या प्रगतीत शिक्षकांचा वाटा अनन्यसाधारण असल्याने त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. नावेश मोहता, माजी अध्यक्ष (आय.पी.पी.) इंजि. रवि पवार, सचिव श्यामकुमार शर्मा, राजकुमार गांधी, कैलास साबळे, संदीप ढोक, विवेक रघुवंशी, अश्विन पितांबरवाले यांच्यासह रोटरी क्लबचे सदस्य, शिक्षक व नागरिकउपस्थित होते.


## मानवधर्म नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अकोला (र.नं.333)

श्री. विजय काटे यांचे घर, पहिला मजला, श्री संकटमोचन हनुमान मंदिराच्या गल्लीमध्ये शास्त्री नगर, जवाहर नगर, अकोला ४४४ ००१.

### २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांसाठी)

दिनांक : ०५ सप्टेंबर २०२६

संस्थेच्या सभासदांची सन् २०२५-२०२६ या सहकारी वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा (२७ वी सर्वसाधारण सभा) रविवार, दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता हॉटेल सेंटर प्लाझा, केडिया प्लॉट, अकोला येथे आयोजित करण्यात आली आहे.

सर्व सभासदांनी ठीक वेळेवर उपस्थित राहावे जेणेकरून सभा निर्धारित वेळेवर सुरु करता येईल.

**सभेपुढील विषय**

१) दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२) संस्थेच्या दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपणाऱ्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक स्विकारणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विनियोजनास मान्यता देणे.
४) सन् २०२५-२०२६ चा अंकेक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) सन् २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) अंतर्गत हिशोब तपासनीस, कर सल्लागार, संचालक यांचे भत्ते आणि कर्मचारी बोनस इन्सेन्टिव्ह बाबत निर्णय घेणे.
७) सन् २०२५-२०२६ मध्ये संचालक व नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची आणि वसुलीची माहिती देणे.
८) सन् २०२६-२०२७ च्या लेखापरिक्षणासाठी शासनाचे पॅनेलवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे व मानधनास मान्यता देणे.
०९) सन् २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी याहेरील कर्जमर्यादा व जबाबदारी निश्चित करणे.
१०) अनावश्यक निधींच्या रक्कमा स्वनिधीत किंवा व्यवहारात वर्ग करणे.
११) माननीय अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : अकोला.

दिनांक: ०५ सप्टेंबर २०२६

**नरेंद्र महादेवराव डंबाळे** (व्यवस्थापक)

**डॉ. रणजित निळकंठराव देशमुख** (सचिव)

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## क्षुल्लक कारणातून महिला वाहकाला मारहाण

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**पुसद :** येथील बस स्थानकात ड्युटी लावण्याच्या कारणावरून पुरुष वाहकाने महिला वाहकाला अश्लील शिवीगाळ करून जबर मारहाण केली. ही घटना ४ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. याप्रकरणी पुसद शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध अॅट्रॉसिटीसह विविध कलमान्वये ५ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे.

अमोल दत्तात्रय धाडवे (४५, रा. वासविनगर, पुसद) असे मारहाण करणाऱ्या वाहकाचे नाव आहे. आशा मारोती ब्रह्मटेके यांच्या तक्रारीनुसार पुसद बस आगारात डेपो मॅनेजरला ड्युटी लावण्यासाठी भेटून मला मॅच्युअल का नाही, असे विचारले असता डेपो मॅनेजर यांनी वाहक अमोल धाडवे यांना भेटण्यास सांगितले.

त्यानुसार महिला वाहक आशा ब्रह्मटेके यांनी वाहक अमोल धाडवे यांना भेटून ड्युटी लावण्याबद्दल विचारले असता, त्यांनी वाद घालून शिवीगाळ करत महिला वाहकाचे केस धरून ओढले व स्टीलच्या रॉडने हातावर व डोक्यावर मारून जखमी केले.

# पोलीस कोठडीतून पसार आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**यवतमाळ :** गंभीर गुन्ह्यात अटक करण्यात आलेला आणि उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेले असता पोलिसांच्या ताब्यातून पसार झालेल्या आरोपीला वसंतनगर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत शिताफीने ताब्यात घेतले. हजरत बिलाल शेख मुसा (वय २०, रा. मधुकरनगर, पुसद) असे आरोपीचे नाव आहे.

वसंतनगर पोलिस ठाण्यात ३ सप्टेंबर रोजी गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर हजरत बिलाल याला अटक करून न्यायालयीन आदेशानुसार पोलिस कोठडी मिळविण्यात आली होती.

४ सप्टेंबर रोजी सकाळी आरोपीची शारीरिक तपासणी करण्यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांसोबत त्याला पुसद येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले होते. तेथे पोलिस कर्मचारी कामात व्यस्त असल्याची संधी साधून आरोपीने पळ काढला. रुग्णालयाच्या मागील बाजूस सुरू असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाच्या दिशेने तो पसार झाला.

घटनेची माहिती मिळताच वसंतनगर पोलिसांसह पुसद शहर, पुसद ग्रामीण, आरसीपी पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी आरोपीचा शोध सुरू केला. पुसद परिसरासह खंडाळा, सेतू, पोखरी, श्रीरामपूर, उमरखेड, वाशिम, माहूर आणि नांदेड परिसरातही शोधमोहीम राबविण्यात आली.

दरम्यान, पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे यांनी स्वतः पथकासोबत रात्रंदिवस शोधमोहीम राबवत गोपनीय माहितीचे जाळे सक्रिय केले. आरोपी आपल्या मधुकरनगर येथील घरी आल्याची माहिती मिळताच पोलिसांनी पहाटे सुमारे तीन वाजता तेथे धाड टाकून त्याला ताब्यात घेतले.

पोलिसांच्या ताब्यातून पसार झाल्याप्रकरणी पुसद शहर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २६२ अन्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक आशिक योरात आणि उपविभागीय पोलिस अधिकारी अगरसिंग मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शिवप्रसाद आवळकर करीत आहेत.

# विद्यार्थ्यांनी साकारली शिक्षकांची भूमिका; 'एक दिवस शिक्षक' उपक्रम



प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**पुसद :** गुणवंतराव देशमुख माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय, कवडीपूर तांडा येथे भारताचे माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी श्रद्धेय डॉ. पंजाबराव देशमुख व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

'एक दिवस शिक्षक' उपक्रमातून विद्यार्थ्यांनी साकारली शिक्षकांची भूमिका

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिलीप राठोड होते. प्रमुख पाहुणे म्हणून अविनाश कऱ्हाळे व प्रवीण तगलपल्लेवार उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनी मुख्याध्यापिका म्हणून आकांक्षा गायकवाड, तर उपमुख्याध्यापिका म्हणून जयश्री सुतारे यांनी जबाबदारी सांभाळली.

'एक दिवस शिक्षक' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत वर्गात अध्यापन केले. यामुळे विद्यार्थ्यांना पाठनियोजन, वर्गव्यवस्थापन, शिस्त, संवादकौशल्य, नेतृत्व आणि जबाबदारीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. यावेळी डॉ. राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचे स्मरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन वैष्णवी हब्बू यांनी, तर आभार प्रदर्शन सोनाली राठोड यांनी केले.

# शिक्षकांना ग्रामसभा घेण्याची सक्ती नको

## शिक्षक समितीचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन : 'कोणावरही कारवाई होणार नाही'ची ग्वाही

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**यवतमाळ :** शिक्षकांना ग्रामसभा घेण्याची सक्ती करू नये, तसेच प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित सेवाविषयक समस्या तातडीने निकाली काढाव्यात, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महागाव तालुका शाखेच्या वतीने शुक्रवारी (४ सप्टेंबर) गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

शिक्षक समितीच्या शिष्टमंडळाने गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेऊन विविध शैक्षणिक व प्रशासकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. ग्रामसभा तसेच अन्य अशैक्षणिक कामांची सक्ती करण्यात येऊ नये, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली.

या चर्चेदरम्यान गटविकास अधिकाऱ्यांनी शिक्षकांना दिलासा देत, "ग्रामसभेच्या कामकाजाबाबत शिक्षकांनी कोणतीही भीती बाळगू नये. या संदर्भात कोणत्याही शिक्षकावर प्रशासकीय कार्यवाही केली जाणार नाही. प्रशासकीय प्रतिनिधी म्हणून ग्रामसभेत केवळ इतिवृत्ताचे वाचन करणे एवढीच जबाबदारी शिक्षकांवर राहील," असे स्पष्ट केले. तसेच तालुक्यातील शिक्षकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी लवकरच विशेष सभा घेऊन मार्गदर्शन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**वेतन पावतीसह विविध मागण्या :** शिक्षकांना दरमहा संगणकीय वेतन पावती वेळेत मिळावी, प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके तातडीने मंजूर करून जिल्हा परिषदेकडे पाठवावीत, बँक, पतसंस्था व एलआयसीच्या कपातीचे धनादेश वेळेत संबंधित संस्थांकडे जमा करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

शिक्षकांची सेवापुस्तके व वेतन पडताळणी नोंदी अद्ययावत करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर विशेष शिबिर घेण्यात यावे. तसेच शाळांमधील रिक्त पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलवर नवीन शिक्षण सेवकांची मागणी तातडीने नोंदवावी, अशी मागणीही करण्यात आली.

शिष्टमंडळाचे नेतृत्व जिल्हा संपर्कप्रमुख सुरेश पांचाळ, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अभिमान मुंडे, यवतमाळ ग्राहक भांडारचे संचालक सुनील राठोड, संभाजी निंबाळकर, युवा तालुकाध्यक्ष अंकुश पाटील आणि तालुका सचिव नितीन व्यवहारे यांनी केले. यावेळी राहुल लंबे, तानाजी सावंत, प्रदीप गावंडे, नारायण सोनुले, उल्हास कुलकर्णी आणि बालाजी बलीकोंडावार यांच्यासह शिक्षक समितीचे पदाधिकारी व शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

# उमरखेडमध्ये कर्तृत्ववान शिक्षकांचा गौरव

## शिवसेना शिक्षक आघाडीतर्फे शिक्षक दिन; तिघांचा पक्षप्रवेश

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**उमरखेड :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून उमरखेड शहर शिवसेना शिक्षक आघाडीच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री संजय राठोड, संपर्कप्रमुख श्रीधर मोहड, जिल्हाप्रमुख राजुदास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम ५ सप्टेंबर रोजी शिवसेना नेते साहेबराव कांबळे यांच्या निवासस्थानासमोरील कार्यालयात पार पडला.

यावेळी शिवसेनेत सक्रिय असलेले माजी प्राचार्य डॉ. वि. ना. कदम, चीतांगराव कदम, श्रीराम चव्हाण, माजी मुख्याध्यापक तथा निज धाम आश्रमचे प्राध्यापक माधवराव मोरे, प्रा. डॉ. प्रदीप इंगोले, शालिग्राम हेडाव आणि गोर सर यांचा शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल गौरव करण्यात आला.

राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक आनंद देशमुख, राज्यपाल पुरस्कारप्राप्त शिक्षक गाजी, योगशिक्षिका अलका मुडे, सुरेश गोरे, शिवाजीराव देवसरकर, शिवसेना कार्यकर्त्या शिक्षिका अश्विनी कुबडे, किड्स इंग्लिश मीडियमच्या शिक्षिका ज्योती मोहिते यांच्यासह इतर शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिलदादा नरवाडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून तालुकाप्रमुख प्रवीण पाटील मिराशे, महिला शहरप्रमुख सपना चौधरी, शहरप्रमुख अॅड. संजीवकुमार जाधव, अल्पसंख्याक शहरप्रमुख गौसराज आणि माजी उपजिल्हाप्रमुख कैलास कदम उपस्थित होते. शिवसेना कार्यकर्त्या सारिका कोकांडे यांच्या हस्ते त्यांचे पती मनोज कोकांडे यांचाही शिक्षक दिनानिमित्त सत्कार करण्यात आला.

यावेळी शिक्षक आघाडीचे शहरप्रमुख प्रा. माधवराव मोरे यांचा अॅड. जाधव यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. त्यांना प्रा. प्रदीप ढवळे लिखित 'योद्धा कर्मयोगी' हे एकनाथ शिंदे यांच्या जीवनपटावर आधारित पुस्तक भेट देण्यात आले.

दरम्यान, कार्यक्रमाचे औचित्य साधून शिवाजी थोटे, चारुलता शिशीर गिरी आणि मयुरी पवार यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. उपस्थित मान्यवरांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मोरे यांनी केले. युवा सेनेचे शहरप्रमुख विनायक पोहरकर यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिवसेना प्रवक्ते तथा उपशहरप्रमुख बसवेश्वर शिरसागर यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शिवसेना व महिला सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'शिक्षक दिन' उत्साहात

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**यवतमाळ :** विकास हिंदी व कनिष्ठ महाविद्यालयात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमात सुमारे ९० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाळेचे संपूर्ण नियोजन आणि दिवसभराची शैक्षणिक दिनचर्या यशस्वीपणे सांभाळली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. यावेळी इयत्ता दहावीची विद्यार्थिनी अनन्या ठाकरे हिने मुख्याध्यापिकेची भूमिका साकारली. तिला प्रतिमेस माल्यार्पण करण्याचा मान मिळाला. तसेच तिने अभ्यासपूर्ण व प्रभावी अध्यक्षीय भाषणातून शिक्षक दिनाचे महत्त्व विशद केले.

दिवसभरात विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत मनोगते मांडली आणि शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

शिक्षक दिनाच्या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व ९० विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी पेन देऊन सन्मानित करण्यात आले.

मुख्याध्यापिका सौ. अनुश्री वैद्य यांनी विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या शिस्तबद्ध नियोजनाचे कौतुक करून सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आर्णी येथे तीज उत्सव : तीज-जवाराचे अरुणावती नदीपात्रात विसर्जन

## नायक प्रेमकिसन राठोड यांचा सत्कार

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**आर्णी :** बंजारा समाजाची श्रद्धा, संस्कृती, पारंपरिक जीवनपद्धतीचे दर्शन घडविणारा आर्णी नगरीतील तीज-जवारा उत्सव शनिवारी (५ सप्टेंबर) भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. उत्सवाच्या नवव्या दिवशी पारंपरिक पद्धतीने तीज-जवाराची तोडणी करून विधिवत विसर्जन करण्यात आले.

माधवनगर येथील संत सेवालाल महाराज मंदिर परिसरात नायक, कारभारी, डाये-साण, नसाबी-हसाबी तसेच समाजबांधवांच्या उपस्थितीत तीज-जवाराचे धार्मिक विधी पार पडले.

विसर्जन मिरवणुकीपूर्वी पुणे येथील नायक तथा राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ता प्रेमकिसन राठोड यांनी उत्सवाला सदिच्छा भेट दिली. त्यांच्या उपस्थितीने समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी आर्णी येथील नायकांच्या हस्ते प्रेमकिसन राठोड यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते सुरेश पवार यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

यानंतर तीज-जवाराचे विधिवत पूजन करून विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ झाला. हजारो महिला भगिनी व भाविक पारंपरिक वेशभूषेत मिरवणुकीत सहभागी झाले होते. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या मिरवणुकीत पारंपरिक बंजारा नृत्य आणि जल्लोषाने वातावरण भारावून गेले. महिला भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली.

मिरवणूक अरुणावती नदीपात्रात पोहोचल्यानंतर तीज-जवाराचे पूजन करून श्रद्धापूर्वक विसर्जन करण्यात आले. बंजारा समाजाची समृद्ध सांस्कृतिक परंपरा जतन करून ती पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देत उत्सवाची सांगता झाली.



यावेळी आर्णीचे नायक रमेश नाईक, टी. डी. चव्हाण, डॉ. विलास चव्हाण, कारभारी तुकाराम राठोड, कैलास आडे, पुंडलिक राठोड, प्रकाश जाधव, सामाजिक कार्यकर्ते रंजीतभाऊ राठोड, प्रकाश राठोड, निलेश राठोड, बाबाराव राठोड, देविदास आडे, विपिनभाऊ राठोड, विनोद चव्हाण, रामसिंग जाधव, विजयसिंग दुलसिंग भाऊ राठोड, संभाजीनगर येथील कारभारी, नंदकुमार राठोड, संजय आडे सर, के. आर. चव्हाण, राजूभाऊ राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव व महिला उपस्थित होत्या.

श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा जागर करणाऱ्या या उत्सवामुळे आर्णी नगरीत दिवसभर भक्तिमय वातावरण होते.

# तीज उत्सवातून बंजारा संस्कृतीचा जागर

## सेवादास कॉलनीत महिला, युवतींचा उत्स्फूर्त सहभाग; अंबोना तलावात पारंपरिक पद्धतीने विसर्जन

प्रतिनिधी ७ सप्टेंबर



**उमरखेड :** बंजारा समाजाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेला तीज (गौरी) उत्सव येथील सेवादास बंजारा कॉलनीत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नऊ दिवस चाललेल्या या उत्सवात महिला, युवती, तरुण-तरुणी तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषा, लोकगीते, नृत्य आणि धार्मिक विधींमुळे परिसरात बंजारा संस्कृतीचे रंग अनुभवायला मिळाले.

तीज उत्सवाला बंजारा समाजात विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. निसर्ग, शेती, पाऊस आणि सुखी संसाराशी जोडल्या गेलेल्या या उत्सवात महिला आणि युवती श्रद्धेने सहभागी होतात. उत्सवाच्या सुरुवातीला जवाराची पेरणी करण्यात आली होती. नऊ दिवस महिला व लहान युवती तांड्यातील प्रत्येक घरी सकाळ-संध्याकाळ जाऊन जवाराला पाणी देत होत्या. या परंपरेतून समाजातील एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले.

समारोपाच्या दिवशी राधा-कृष्णांची विधिवत स्थापना करण्यात आली. तांड्यातील नायक, कारभारी, प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि पारंपरिक वेशभूषेतील युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. ५ सप्टेंबर रोजी पारंपरिक ढमौळीचा कार्यक्रम झाला. त्यानंतर ६ सप्टेंबर रोजी दिवसभर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ४ वाजता अंबोना तलाव येथे तीजचे पारंपरिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. या उत्सवाला पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनीताई नाईक, उमरखेडच्या नगराध्यक्षा तेजश्री जैन, निधी नितीन भुतडा, नगरसेविका ज्योत्स्ना प्रतिक रुडे, अरुणाताई राठोड, पुष्पलता कैलास राठोड, संगीता रवींद्र जाधव, वसलाबाई रमेश राठोड, अलकाताई मुडे यांच्यासह अनिल राठोड, उत्तम राठोड, बाबूसिंग राठोड, सुरेश राठोड, जय राठोड, लक्ष्मण जाधव आदी उपस्थित होते. उत्सवाच्या आयोजनासाठी तांड्यातील नायक कैलास राठोड, कारभारी डॉ. रवींद्र जाधव, नाईकनगरचे नायक रमेश राठोड आणि सुभाष जाधव यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन बँक व्यवस्थापक शेषराव जाधव यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रकाश राठोड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रवींद्र जाधव यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. प्रतिक रुडे यांनी आभार मानले.

### नव्या पिढीपर्यंत वारसा पोहोचविण्याचा प्रयत्न

- बंजारा तीज उत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजाची संस्कृती, परंपरा आणि पारंपरिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

## कळंब येथे कराटे प्रशिक्षण

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**कळंब :** येथील शिवशक्ती विद्यालयात कराटे प्रशिक्षण शिबिर पार पडले. समारोप कार्यक्रमाला ठाणेदार धनराज निळे, विजय महाजन, विशाल राठोड, सखी सावित्री मंचच्या सदस्या प्रगती खराटे, कराटे प्रशिक्षक संजय पाटील आदी उपस्थित होते. विद्यार्थिनींनी संकटाच्या प्रसंगी कराटे प्रशिक्षणातून मिळालेल्या कौशल्यांचा योग्य वापर करून स्वत:चा बचाव करावा, असे आवाहन ठाणेदार धनराज निळे यांनी केले. विशाल राठोड यांनी स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. शारीरिक शिक्षक आशिष दुधाने यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षण शिबिराचा उद्देश व विद्यार्थ्यांच्या सहभागाची माहिती दिली. संचालन प्रवीण राऊत यांनी, तर अविनाश शिरसाठ यांनी आभार मानले.

## बालगोपालांच्या तान्हा पोळ्याचा उत्सव

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**आर्णी :** पारंपरिक सण-उत्सवांची ओळख बालमनात रुजविण्यासह बालगोपालांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आर्णी पत्रकार संघ आणि ईश्वर इंग्लिश मीडियम स्कूल, शिवनेरी चौक यांच्या संयुक्त विद्यमाने तान्हा पोळा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

११ सप्टेंबरला स्पर्धा

ही स्पर्धा ११ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता ईश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या पटांगणात होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात शहर व परिसरातील बालगोपालांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास अंजली ड्रेसेसतर्फे २ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी सामाजिक कार्यकर्ते मोबीन मलनस यांच्यातर्फे १ हजार ५०१ रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी अंजली ड्रेसेसतर्फे १ हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे.

तान्हा पोळ्याच्या निमित्ताने बालगोपालांमध्ये पारंपरिक संस्कृती, सण-उत्सव आणि ग्रामीण जीवनाशी असलेले नाते दृढ व्हावे, तसेच बैलपोळ्याच्या परंपरेची पुढील पिढीला ओळख व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या स्पर्धेत आर्णी शहर व परिसरातील बालगोपालांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आर्णी पत्रकार संघाचे अध्यक्ष आबीद फानन, उपाध्यक्ष मनोज माघाडे, सचिव जाकीर सोलंकी, कार्याध्यक्ष गणेश एकंडवार, कोषाध्यक्ष परवेज बेग मिर्झा, सल्लागार प्रमुख रंजना आडे यांनी केले आहे.

# सोनोरी येथे वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**चांदुरबाजार** : सोनोरी, ता. चांदूर बाजार येथे वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक , सहाय्यक पोलीस अधीक्षक अचलपूर, तहसीलदार चांदूर बाजार आणि स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

वाघाचा शोध घेऊन त्याला तातडीने पकडण्यासाठी वन विभागाशी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक समन्वय साधला जात आहे. वन विभागाने अधिक पथके तैनात करून वाघाचा शोध घेण्याची कार्यवाही करण्याचे मान्य केले आहे.

नागरिकांनी घाबरून जाऊ नये तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाकडून वन विभागास आवश्यक ते सर्व सहकार्य व समन्वय करण्यात येत आहे.

कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांनी पोलीस पाटील, संबंधित स्थानिक पोलीस ठाणे किंवा डायल ११२ वर तातडीने संपर्क साधावा.

नागरिकांनी सतर्क राहावे, मात्र अनावश्यक भीती बाळगू नये.



चांदूरबाजार तालुक्यात वाघिणीने महिलेचा बळी घेतल्यानंतर माजी खासदार नवनीत राणा यांनी वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी रेड्डी यांना खडे बोल सुनावले.



वाघिणीच्या हल्ल्यात चांदूरबाजार तालुक्यातील एका मुलीचा बळी गेला, तिच्या कुटुंबीयांची माजी खासदार नवनीत राणा यांनी भेट घेतली, परिवाराचा आक्रोश पाहून नवनीत राणा ही गहिवरल्या. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेखा ठाकरे यांनाही अश्रू आवरता आले नाही.

# शिक्षक दिनानिमित्त अंध विद्यालयात माजी शिक्षक व कर्मचाऱ्यांचा 'कृतज्ञता सन्मान सोहळा' उत्साहात

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अमरावती** : दि ब्लाईंड वेल्फेअर असोसिएशन, अमरावती द्वारा संचलित डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय व आश्रित अंध कर्मशाळा अमरावतीचा हीरक महोत्सव नुकताच साजरा करण्यात आला त्या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत त्या अनुषंगाने ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून 'कृतज्ञता सन्मान सोहळा' अतिशय उत्साहात आणि भावूक वातावरणात पार पडला.

संस्थेच्या ६० वर्षांच्या गौरवशाली वाटचालीत ज्या माजी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ सेवा देऊन आपल्या ज्ञानाने, कर्तृत्वाने, सेवाभावाने आणि समर्पणाने मोलाचे योगदान दिले, अशा ६० कर्मचाऱ्यांचा मार्गदर्शकांचा यावेळी कृतज्ञतापूर्वक सन्मान व सत्कार करण्यात आला. हा सोहळा विद्यालयातील विद्यावती श्रीवास्तव सभागृहात पार पडला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष दिनेश गायकवाड (माजी अभियंता, जि. प. अमरावती), प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वर उर्फ नाना आमले (नगरसेवक, व गटनेता मनपा, अमरावती), विशेष अतिथी मिथिलेश तिवारी (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कंत्राटदार, अमरावती) या सर्व प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून अंध विद्यालयाच्या हीरक महोत्सवी वाटचालीचे कौतुक केले आणि शिक्षकांच्या निस्वार्थ सेवेला सलाम केला.

संस्थेचे प्रवीणजी मालपाणी (अध्यक्ष), सुनीलभाऊ सरोदे (उपाध्यक्ष), राजेशजी डागा (कोषाध्यक्ष), ॲड. प्रदीप श्रीवास्तव (सचिव), एन. एस. इंगोले सहसचिव व मुख्याध्यापक, डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, अमरावती तसेच कार्यकारिणी सदस्य धनंजय नाकील, आर. टी. देशमुख, उर्मिला शहा, प्रभा झंवर, मनोज साबू, प्रणित सोनी, रामराव अमृते आणि . पंकज मुदगल (व्यवस्थापकीय अधीक्षक) व . दत्ता राऊत (मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद अंध विद्यालय, परतवाडा) यांचे विशेष सहकार्य लाभले. प्रास्ताविक नवनाथ इंगोले , संचालन योगीता राऊत व योगेश चौधरी यांनी केले आणि आभार प्रदर्शन संस्था प्रभारी सचिव श्री. धनंजय नाकील यांनी केले.

# श्री. क्षेत्र सावंगा नगरीत रमणासह चंदनउटी उत्सव

## ११ आणि १३ सप्टेंबर रोजी विविध कार्यक्रम; गावकरी भाविकांसाठी महाप्रसाद

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**चांदूर रेल्वे:** अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अमावस्येनिमित्त रमणासह चंदनउटी उत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या धार्मिक कार्यक्रमासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी संस्थानच्या अन्नदान समितीच्या नियंत्रणाखाली महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

श्रावण मास मांडीचा वाढवा रविवार दि. १३ सप्टेंबर सकाळी ९ वाजता मुख्य मंदिरात महाराजांच्या अरजानी करून मुख्य मंदिरातून रमणासह लहान मंदिरातील ढाल व मांड वाढवा होणार आहे.दुपारी १२ वाजता सर्व गावकरी मंडळी आणि भाविक भक्तांकरीता भव्य महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे.

भाविकांसाठी दररोज महाप्रसादाची सुविधा- बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी संस्थानच्या अन्नदान समितीच्या वतीने दररोज दुपारी १२ ते १.३० आणि रात्री ८ ते ९.३० या वेळेत प्रसाद (भोजन) वितरण करण्यात येत आहे.

भाविकांनी संस्थानच्या प्रसादालयात प्रसाद देणगीची पावती घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच इच्छुक अन्नदानदाते संस्थानला अन्नदानाची देणगी देऊन या सेवेत सहभागी होऊ शकतात. यासाठी संस्थानशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या सर्व धार्मिक व सामाजिक उपक्रमांना सर्व भाविक भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त वसंत शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी व समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अवैध दारु विक्री करणाऱ्या इसमांवर धडक कारवाई

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अमरावती :** निकेतन कदम, पोलीस अधीक्षक यांनी अमरावती ग्रामीण जिल्हयात ऑपरेशन कवच या संकल्पनेखाली अमरावती ग्रामीण घटकातील सर्व ठाणेदार व स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांना

अवैध दारू व जुगार धंदे यावर कार्यवाही करणेबाबत निर्देशित केले आहे. त्यानुसार दिनांक ०४/०९/२०२६ तसेच ०६/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हें शाखा, अमरावती ग्रा. व विविध पोलीस स्टेशन चांदुर बाजार व चांदुर रेल्वे येथे अवैध दारू धंद्यावर कार्यवाही करण्यात आली असून पो.स्टे. मोर्शी येथे अवैध गावरानी हातभटटी दारू वाहतुकीवर कारवाई - पो.स्टे. मोशी हददीत ग्राम हिवरखेड येथील विटभटटीजवळ दाबका रोहना राज्य मध्यप्रदेश येथुन ग्राम हिवरखेड मोर्शी कडे दोन ईसम त्यांचे मो. सा. वर अवैधरित्या गा.हा.भ. दारू वाहतुक करणार आहे अशा माहितीवरून त्यांचेवर प्रोव्ही रेड केला असता त्यांना पोलिसांची चाहुल लागल्याने सदर दोन्ही ईसम पळुन गेले. त्यांनी घटनास्थळावर टाकलेल्या मो.सा. वर ०५ रबरी ट्युबमध्ये अं. २२० लिटर गावरानी हातभटटी दारू कि.अं.२२,०००/- रू व दोन मो.सा.किं.अं.६०,०००/- रू असा एकुण ८२,०००/-रू चा प्रोव्ही मुददेमाल अवैधरित्या मिळुन आल्याने सदर माल जप्त करण्यात आला. पो.स्टे. चांदुर बाजार येथे अवैध दारू धंद्यांवर कारवाई-नमुद पोलीस स्टेशनला अवैध दारू बाबत २ ठिकाणी कारवाई केली असता आरोपी अशोक मणिराव सुलताने, वय ६० वर्ष, रा. हिरूळपुर्णा, चांदुर बाजार २ मोहन संजय कुरवाडे, वय ४२ वर्षे, रा. हिरूळपुर्णा यांचे पंचासमक्ष घराची झडती घेतली असता त्यांचे ताब्यातून घराचे जिन्याखाली व बसण्याच्या पलंगाच्या खाली २० नग देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या काचेच्या पावटया असा एकूण मुद्देमाल कि.अं. २,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पो.स्टे. चांदुर रेल्वे येथे गावठी हातभट्टी दारू धंद्यांवर कारवाई- आरोपी निला सुंदर पवार, वय ४६ वर्षे, रा. राजीव गांधी नगर, चांदुर रेल्वे यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता असता त्यांचे ताब्यातून ५० लीटर च्या २ प्लास्टिक डबक्या एकूण १०० लीटर गावठी हातभट्टी दारू किंमत अंदाजे १०,२००/- रू असा मुद्देमाल मिळून आला. सदरची कारवाई . पोलीस अधीक्षक . निकेतन कदम (भापोसे), यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनात अशोक लांडे, पोलिस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रा, श्री. आधारसिंग सोनोने, ठाणेदार चांदुर बाजार., व राजीव हाके, स्था.गु.शा.व पथक यांनी केली.

# जवाहर नवोदय विद्यालयाच्या 9 वी व 11 वी प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

## अर्ज करण्याची अंतिम तारिख 30 सप्टेंबर ; पुढील वर्षी 10 एप्रिलला प्रवेश परीक्षा

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अमरावती:** येथील जवाहर नवोदय विद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष 2027-28 साठी इयत्ता 9 वी व 11 वी प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 1 ते 30 सप्टेंबर 2026 दरम्यान ऑनलाईल अर्ज करता येणार असून शनिवार, 10 एप्रिल 2027 रोजी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालय समितीच्या navo-day.gov.in संकेतस्थळावर किंवा इयत्ता 11 वी करिता cbseitms.nic.in/2026/nvsix_11 आणि इयत्ता 9वी करिता cbseitms.nic.in/2026/nvsix_9 अधिकृत संकेतस्थळावर नि:शुल्क अर्ज भरता येणार आहे. विद्यार्थी -विद्यार्थीनी ही अमरावती जिल्हयातील रहिवासी व याच जिल्ह्यातील मान्यताप्राप्त शाळेतून शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये इयत्ता 10 आणि इयत्ता 8वीत क्रमश: इयत्ता 11 वी व 9वीच्या प्रवेशासाठी अध्ययनरत असणे आवश्यक आहे. 9वी प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांचा जन्म 1 मे 2012 ते ३१ जुलै २०१४ आणि १० वी प्रवेशाकरिता १ जून २०१० ते ३१ जुलै २०१२ दरम्यान असावा. आरक्षित आणि अनारक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी जन्म तारखेची अट सारखीच आहे. अधिक माहितीसाठी navo-day.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधता येणार आहे.

# पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर कॉलेज येथे 'वास्तुशास्त्र संवाद व शिक्षक दिन

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अमरावती** : शिक्षक दिनाचे औचित्य साधून पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार, व्यावसायिक दृष्टिकोन आणि वास्तुकलेविषयीची जिज्ञासा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने 'वास्तुशास्त्र संवाद व शिक्षक दिन ' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य संजय देशमूख यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून आर्कि. प्रमोद चौगुले (सांगली), आर्कि. प्रवीण माळी आणि आर्कि. मिलिंद कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी वास्तुकलेतील बदलते प्रवाह, व्यावसायिक क्षेत्रातील संधी, विद्यार्थ्यांनी विकसित करावयाची सर्जनशील दृष्टी तसेच प्रत्यक्ष अनुभवाचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला.



सर्वप्रथम प्राचार्य संजय देशमूख यांनी सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व महाविद्यालय विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करत असते असे आवर्जून सांगितले

मुख्य वक्ते आर्कि प्रमोद चौगुले यांनी आपल्या संवादात सांगितले की वास्तूशास्त्र ही एक व्यापक कला असून शिक्षणा सोबत कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन प्रात्यक्षिक दृष्टीने विचार करणे होय. आर्कि प्रवीण माळी यांनी सांगितले की प्रत्येकाला गुरु असावा जेणेकरून आपले ध्येय पूर्ण करण्यास मदत होईल तसेच त्यांनी सांगितले की दुसऱ्याचे संसाधन वापरून एक चांगली कलाकृती निर्माण करणे होय. आर्कि मिलिंद कुलकर्णी यांनी संवाद साधतांना सांगितले की संयम व धैर्य ही वास्तूकला निर्माण क्षेत्रातील मुख्य बाब आहे, मानसिक शांतता संवेदना व आनंद याच क्षेत्रात मिळू शकते असे या प्रसंगी सांगितले.

विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून वक्त्यांशी उत्स्फूर्तपणे चर्चा केली. कार्यक्रमास प्रा. राम विघे, आर्कि. प्रणय कांबे, आर्कि. अंशुल अग्रवाल आणि आर्कि. शैलेंद्र देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्यासाठी या कार्यक्रमाचे विशेष महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ज्ञानेश्वरी कडू आणि कु. भाविका ठवकर यांनी केले, तर कु. यामिनी इखे हिने आभार प्रदर्शन केले. यानंतर द्वितीय वर्ष आर्च व डिप्लोमा आर्च विद्यार्थ्यांनी शिक्षकांकरिता शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये सर्वात प्रथम शिक्षकांची प्रवेश दिंडी काढून सभागृहात त्यांचे स्वागत केले. त्यानंतर शिक्षकांचे कॅरी कॅचेर ग्रीटिंग्स व पुष्प देऊन सत्कार केला. यापुढे विविध शिक्षकांची खूबी ओळखून त्यांच्या सराईत नकला केल्या ज्यामुळे सभागृहात हास्य फवारे उडाले. तपश्चात शिक्षकांचे हातून पूजा श्री राव या विद्यार्थिनीने बनवलेला केक कटिंग करून स्व हस्ते शिक्षकांना भरवला. या कार्यक्रमाबद्दल शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले

# जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क साधावा

## अमरावती समिती कार्यालय सुट्टीच्या दिवशीही राहणार सुरू

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अमरावती:** जात वैधता प्रमाणपत्रातील अद्याप त्रुटींची पूर्तता केली नसेल अशा विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्याचे आवाहन करत प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती कार्यालय सुट्टीच्या दिवशीही पूर्णवेळ सुरू ठेवण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष 2026-27 मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, कृषी, वैद्यकीय, आयुष आणि कला शिक्षण) प्रवेश प्रक्रियेसाठी राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटींची पूर्तता केलेली नाही. या विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी कार्यालय सुट्टीच्या दिवशीही पूर्णवेळ सुरू ठेवण्यात आले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी उशिराने अर्ज सादर केले आहेत. पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जांमधील त्रुटींबाबत समितीने वेळोवेळी एसएमएस, ई-मेल आणि पत्राद्वारे कळवले असूनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही.अर्जदारांची जबाबदारी प्रवेशाच्या तारखा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) जाहीर करण्यात आल्या आहेत. वेळेत प्रमाणपत्र न मिळाल्यास होणाऱ्या नुकसानीला अर्जदार स्वतः जबाबदार राहतील. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि समितीला वेळेत निर्णय घेता यावा, यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी त्वरित अमरावती समिती कार्यालयाशी संपर्क साधून त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन समितीच्या श्रीमती बोबडे यांनी केले आहे.

# अल्कोहोलिक्स ॲनानिमस 'सेवा समितीचा रौप्य महोत्सव

## अमरावती आंतर समूह 2 द्वारे विविध उपक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अमरावती:** दारू तुमच्या मित्रांची किंवा नातेवाईकांची समस्या बनली आहे काय? असल्यास अल्कोहोलिक्स ॲनानिमस (ए.ए.) आपल्याला मद्रद्यमुक्तीकरिता मदत करू शकते.

व्यसनमुक्तीचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणाऱ्या 'अल्कोहोलिक्स ॲनानिमस' (ए. ए.) च्या 'सेवा समिती महाराष्ट्र राज्य'चा २५ वा रौप्य महोत्सव येत्या ८ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या रौप्य महोत्सवाचे औचित्य साधून 'ए. ए. अमरावती आंतर समूह 02' द्वारे विशेष कार्यक्रम व जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. अल्कोहोलिक्स ॲनानिमसच्या ९ व्या रुढीनुसार, ८ सप्टेंबर २००१ रोजी गोंदिया येथे' ऐ ऐ महाराष्ट्र राज्य' सेवा समिती ची स्थापना करण्यात आली होती. ही संस्था धर्मादाय कार्यालयात अधिकृतपणे नोंदणीकृत असून गेल्या २५ वर्षांपासून अविरतपणे महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये आणि १६४ तालुक्यांमध्ये ७३३ ए. ए. समूहांच्या माध्यमातून दारूच्या व्यसनातून मुक्तीचा संदेश देण्याचे कार्य करत आहे.

या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीनिमित्त अमरावती आंतर समूह 2 द्वारे जिल्ह्यात विविध जनजागृती सभा, मार्गदर्शन आणि सेवा उपक्रम राबवले जाणार आहेत. दारूच्या व्यसनामुळे उद्ध्वस्त होणारे संसार वाचवणे आणि व्यसनी व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. विनामूल्य मदतीसाठी संपर्क: 7507654452

# अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्दैवी घटनेत मृत नवजात शिशुना मौन श्रध्दाजंली

## आ.रवि राणा, माजी खा. नवनित राणा यांचा गरजुंना मदतीचा हात

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**अमरावती** : पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त घुगे, ह.भ.प.अँड.सागर देशमुख महाराज, सिंधी पु.पं.संतोषजी नवालानी, कवंरधामचे राजेशजी मोरडीया, सु.श्री. राम प्रिया, डॉ.अरोरा, महानुभव पंताचे पिंटु महाराज यांची आशिर्वादमय उपस्थिती सह, ट्राफिक पोलीस प्रमुख संजय खताडे, राजापेठ पी.आय. संदीप चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.




कार्यक्रमा दरम्यान जिल्हा स्त्री रुग्णालयातील पिडीत कुटुंबातील महिलांना आर्थीक सहाय्यसह 400 पिडीत कुटुंबातील महिलांना शिलाई मशिन वाटप, दुदैवी मुत्यु झालेल्यांचा कुटुंबियांना आर्थीक मदत, विर परीचाकरीका, सुरक्षा रक्षक, डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा सन्मान सत्कार करुन आर्थीक सहाय्य, गोर-गरीब गरजु कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणीक मदत, जन्मताच अपंग व गंभीर आजार असलेल्या नवजात शिशुचा मातांना आर्थीक मदत व शिलाई मशिन, कर्णयंत्र वाटप, 100 च्यावर अंध दिव्यांग, मतीमंद बांधवाना आर्थीक मदत व साहित्य वाटपासह अमरावती जिल्हयातील सर्व तालुक्यातील आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंब व अपघाती मुत्यु झालेल्या कुटुंबियांना धनादेश व रोख रक्कमेव्दारे आर्थीक मदत

राधा कृष्णाच्या वेशभुषेतील आलेल्या बाल गोपालाच्या हस्ते पि.एम. मित्रा टेक्सस्टाईल, चिखलदरा स्काय वॉक, बेलोरा पायलट ट्रेनिंग सेंटर, अमृत-2 पाणी योजना, अमरावती विमानतळ, बडनेरा रेल्वे वॅगन फॅक्टरी, हनुमान गढी, शासकीय मेडीकल महाविद्यालय बडनेरा, रेल्वे अंडरपास फ्लाय ओव्हर, छत्री तलाव सौदर्यीकरण, बोधीभुमी सांस्कृतीक संकुल, अंबादेवी व एकविरा देवी मंदिर सौदर्यीकरण, अकोली रेल्वे स्टेशन, बडनेरा मॉडेल रेल्वे स्टेशन इत्यादी विकास कामांना समर्पित करुन दहिहांडी फोडुन कोणताही गाजावाजा न करता दहिहांडी उत्सव केला साजरा करण्यात आला.

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नवजात शिशूंना मौन श्रद्धांजली अर्पण करून युवा स्वाभिमान पार्टीतर्फे रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी नवाथे चौक, अमरावती येथे विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांना सुरुवात करण्यात आली. आ. रवि राणा आणि भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. यावेळी अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नवजात शिशूंना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच विविध दुर्घटना व कारणांमुळे मृत्युमुखी पडलेल्या स्व. शर्वरी हाडके, स्व. महेंद्र सिरसाठ, स्व. लोकेश म्हाला, स्व. विवेक महाजन आणि स्व. संतोष नवाथे यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या संपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ५० लाख रुपयांचा सामाजिक मदतीचा हात गरजू, पीडित, दिव्यांग, विद्यार्थी, शेतकरी आणि विविध संकटग्रस्त कुटुंबांना देण्यात आला.

या सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमाला पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त, ह.भ.प. ॲड. सागर देशमुख महाराज, सिंधी पु.पं. संतोषजी नवालानी, कंवरधामचे राजेशजी मोरडिया, सु. श्री. राम प्रिया, डॉ. अरोरा आणि महानुभव पंथाचे पिंटू महाराज यांची आशीर्वादमय उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत विविध सामाजिक उपक्रमांना सुरुवात करण्यात आली. यावेळी नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि गरजू नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

६
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. ७ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

**सावधान...**
**दुध जन्य पदार्थ निकृष्ट जीवनाशी खेळ उत्कृष्ट**




## वाशीमच्या २ दूध डेअरी मधील...

# दूधजन्य पदार्थ भेसळयुक्त!

## कारवाई करा संयुक्त, मॅनेजमधून करू नका मुक्त

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●**

***गुणवत्तेवर एफडीएचा बडगा**
***खोवा, तूप आणि पनीरचे नमुने निकृष्ट;**
***व्यावसायिकांवर कारवाईची प्रक्रिया सुरू**



नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत अन्न व औषध प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून, वाशिम शहरातील दोन अन्न व्यवसाय आस्थापनांमधून घेण्यात आलेल्या नमुन्यांपैकी खोवा, तूप आणि पनीरचे नमुने निकृष्ट दर्जाचे असल्याचे प्रयोगशाळेच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात संबंधित अन्न व्यवसाय चालकांविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, अधिकाऱ्यांनी सयुक्त कारवाई करून मॅनेज मधून या भेसळखोरांना मुक्त करू नये अशी मागणी होत आहे.

नागरिकांना सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि निर्धारित मानकांनुसार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन, वाशिम यांच्याकडून शहरात दुग्धजन्य पदार्थांची नियमित तपासणी व नमुना संकलन मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेदरम्यान वाशिम शहरातील रेणुका फूड्स येथून तीन, तर मा. चामुंडा दूध डेअरी येथून दोन नमुने घेण्यात आले होते. असे एकूण पाच नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. प्राप्त प्रयोगशाळा अहवालानुसार रेणुका फूड्स येथील खोवा व तूप तसेच मा. चामुंडा दूध डेअरी येथील पनीर हे नमुने निर्धारित गुणवत्तामानकांमध्ये तफावत आढळल्याने 'निकृष्ट' (Sub-standard) घोषित करण्यात आले आहेत. तपासणी अहवालात तुपाच्या तसेच पनीरच्या नमुन्यांमध्ये SBR (Butyro-Refractometer) Reading निर्धारित मर्यादेपेक्षा किंचित अधिक आढळून आली. तर खोव्याच्या नमुन्यात Milk Fat on Dry Matter चे प्रमाण निर्धारित मानकापेक्षा कमी असल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रयोगशाळा अहवालांच्या आधारे संबंधित अन्न व्यवसाय चालकांविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच त्याअंतर्गत लागू नियम व विनियमांनुसार पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा थेट संबंध नागरिकांच्या आरोग्याशी असल्याने गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून मिळत आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियमित तपासणीमुळे बाजारात विक्री होणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेवर सातत्याने नजर ठेवली जात असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अन्न व्यवसाय चालकांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई केली जाणार आहे.

नागरिकांना सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाची तपासणी व नमुना संकलन मोहीम यापुढेही अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### मंगरूळपीर येथील माहीन फलक बनली एक दिवसाची शिक्षक

**●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●**



दि. ५ सप्टेंबर रोजी देशाचे पूर्व राष्ट्रपती डॉ राधाकृष्ण सर्वपल्ली यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.

जन्मदिवसानिमित्त एक दिवसाचा शिक्षक म्हणून बिलाल नगर ट्युशन सेंटर कु. माहीन फलक नी.शिक्षकाची भूमिका निभवल्यास यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते

### शेख उर्दू शाळेत शिक्षक दिन




**●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●**

मंगरूळपीर येथील एम. एम. शेख उर्दू प्राथमिक स्कूल मध्ये डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला त्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनेक उल्लेखनीय कार्य केल्यामुळे त्यांचा जन्मदिवस शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षक बनवून ते विद्यार्थी विद्यार्थ्यांना त्यांच्याविषयी शिक्षण घेतल्याने आपला समाजाचा आणि देशाच्या उन्नतीसाठी आपण काय करू शकतो हे यावेळी सांगतात. यावेळी मुलांनी शिक्षकांची भूमिका निभवितांना शाळेमध्ये उत्साहाचे वातावरण होते. तसेच शिक्षक वृंद विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती जावेद अहमद सौदागर (प्रदेश सचिव महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमेटी) फारूक अहमद सौदागर शिक्षक सय्यद सलमान मोहम्मद फिरोज हिफजुर्रहमान मोहम्मद अफजल इमरान खान सह शिक्षक उपस्थित होते.

### य.च.कला व विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



**●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●**

मंगरुळपीर : यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर येथे शिक्षक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे सर होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी तथा सध्या बँक ऑफ महाराष्ट्र, मंगरुळपीर शाखेत कार्यरत असलेल्या आदरणीय राखी मंत्री उपस्थित होत्या.

यावेळी कला विभागाचे प्रमुख डॉ. एस. जे. वाघोले सर, तसेच विज्ञान विभागाचे प्रमुख व सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. इंगळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगत आपल्या मनोगतातून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून शिक्षकांनी दिलेले ज्ञान, संस्कार व मार्गदर्शन यांचे महत्त्व अधोरेखित झाले. त्या काही विद्यार्थ्यांनचे नावे पुढील प्रमाणे आहे : अनुश्री मुळे, श्रुती पंडित, पुजा अहिरवाल, शिवानी वाघ, जान्हवी गजरे, पल्लवी गावंडे, पूर्वा मनवर, जान्हवी गिरी, ज्ञानेश्वरी मिरासे, लक्ष्मी गाढवे, स्वाती लांबाडे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी रिया गादेकर व टिनु लुंगे यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या शेवटी बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. सीमा परवीन यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग नोंदविणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## कारंज्यात 'तिज' उत्सव निमित्त शोभायात्रा

**●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●**



बंजारा समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा 'तिज' उत्सव रविवार, ६ सप्टेंबर रोजी कारंजा शहरात मोठ्या उत्साहात आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. तिज विसर्जनानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. डफड्याच्या तालावर पारंपरिक बंजारा नृत्य सादर करत महिला व तरुणींनी संपूर्ण वातावरणात उत्साह आणि चैतन्य निर्माण केले. बंजारा समाजाच्या परंपरेत 'तिज'ला हिरवळीचे आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. पूर्वी बंजारा समाज रानोमाळ वस्ती करून राहत असताना महिला व मुलींना एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा करता यावा, तसेच निसर्ग, शेती आणि धनधान्याच्या समृद्धीसाठी प्रार्थना करता यावी, या उद्देशाने तिजची परंपरा सुरू झाल्याचे समाजातील ज्येष्ठ जाणकार सांगतात. रक्षाबंधनाच्या दिवशी तिजची पेरणी करण्याची परंपरा असून, त्यानंतर साधारण ७ ते ९ दिवस हा उत्सव उत्साहात साजरा केला जातो. या कालावधीत तरुणी व महिला दररोज सकाळ-संध्याकाळ तिजची पूजा करतात. ज्वारीच्या हिरव्यागार रोपांची पारंपरिक पद्धतीने पूजा करून 'धनधान्य पिकू दे, हिरवळ सदैव नांदू दे, कुटुंबात सुख-समृद्धी राहू दे', अशी मनोभावे आराधना केली जाते. तिज विसर्जनाच्या आदल्या दिवशी 'ढंबोळी पूजन' करून तिजची विधीवत पूजा केली जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पारंपरिक पद्धतीने तिजची शोभायात्रा काढून तिचे विसर्जन केले जाते. याच परंपरेनुसार कारंजा येथेही तिज विसर्जनानिमित्त आकर्षक शोभायात्रा काढण्यात आली. शोभा यात्रेच्या सुरवातीला बंजारा समाजाचे धर्मगुरू आमदार बाबुसिंग महाराज, महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री मा.ना.संजय राठोड यांच्या धर्मपत्नी शितल राठोड, कारंजा मानोरा मतदारसंघाच्या आमदार सईताई डहाके, माजी नगराध्यक्ष दत्तराजजी डहाके, यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मा. अध्यक्षा कालिंदा ताई पवार, कारंजा नगरपरिषदेच्या नगरसेविका ज्योतीताई राठोड यांच्यासह समाजातील मान्यवरांची व इतरांची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद प्रशासनाविरोधात शिक्षकांचे आज धरणे आंदोलन

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●**

जिल्हा परिषद वाशिमच्या शिक्षण विभागाच्या कथित मनमानी व शिक्षकविरोधी धोरणांविरोधात जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने सोमवार, ७ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद परिसरात एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

शिक्षक समायोजन आदेश, पदोन्नती प्रक्रियेतील कथित अनियमितता, प्रलंबित वैद्यकीय बिले, निवड श्रेणी व चटोपाध्याय प्रस्ताव तसेच शिक्षकांवर लादण्यात येणाऱ्या अशैक्षणिक व अनावश्यक ऑनलाइन कामांचा निषेध करण्यात येणार आहे. दरम्यान, शिक्षकांनी काळा शर्ट, काळी रिबीन अथवा काळ्या फिती लावून काम करीत प्रशासनाचा निषेध नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वाशिममधील शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या - सागर कोकास

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●**





वाशिम जिल्ह्यासह विदर्भातील अनेक भागांत अपुरा व अनियमित पाऊस झाल्याने खरीप पिकांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे कमी पावसामुळे बाधित भागांचे तातडीने सर्वेक्षण करून दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करावी व शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी आम आदमी पार्टी महाराष्ट्रचे प्रवक्ते सागर कोकास यांनी केली आहे.

कमी पावसामुळे नुकसान झालेल्या सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी. तसेच पीकविमा भरपाई, शेती कर्ज व वीजबिलाबाबत शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या भागांत पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. पुढील हंगामासाठी बियाणे व खते अनुदानित दरात उपलब्ध करून देण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे. शेतकरी नैसर्गिक संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडला असून शासनाने केवळ पंचनामे न करता प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी, असे सागर कोकास यांनी म्हटले आहे.

## उमेद च्या ग्रामसखींनी पुकारले ऑनलाईन काम बंद आंदोलन

### मागण्या मान्य न झाल्यास ऑफलाईन काम सुद्धा बंद करणार

**●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●**



उमेद अभियाना अंतर्गत गाव व प्रभाग स्तरावर कार्यरत ग्रामसखी तसेच कॅडरच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उमेद महिला व कल्याणकारी संघटनेने आमदार सईताई डहाके व गटविकास अधिकारी यांना निवेदन दिले असून दिनांक २४ ऑगस्ट २०२६ पासून ऑनलाईन काम बंद तसेच मागण्या मान्य झाल्या नाही तर ऑफलाईन काम सुद्धा बंद करण्यात येईल असा निर्णय घेतला आहे.

मागण्यांची पूर्तता होईपर्यंत ग्रामसखी गावपातळीवरील आवश्यक भौतिक कामे सुरू ठेवतील, परंतु ऑनलाईन कामे न करण्यांची भूमिका संघटनेने घेतली आहे. तसेच लेखी निवेदन कारंजा येथील गटविकास अधिकारी यांना दि. २७ ऑगस्ट रोजी देण्यात आले. राज्य संघटनेमार्फत मागील महिन्यापासून जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक आणि गटविकास अधिकारी यांना निवेदने देण्यात आली आहेत. तसेच नागपूर येथे

ग्रामविकास मंत्र्यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या बैठकीच्या इविवृतानुसार सकारात्मक निर्णय घ्यावेत व कामावर पुर्वरित मागण्यांवर एका महिन्यात निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे. गटविकास अधिकारी पंचायत कारंजा यांना दिलेल्या निवेदनात प्रमुख मागण्या विमा व अनुदान टॅब व ऑनलाईन कामासाठी सामुग्री अनुदान, कामावर स्त्यांची अपघाती, नैसर्गिक मृत्यू किंवा अपघाती मृत्यू झाल्यास ग्रामसखी ४५ लाख रुपयांचा विमा अथवा सानुग्रह अनुदान देण्याचा शासन निर्णय तातडीने काढावा. थकीत व वाढीव मानधन तातडीने द्यावे, मागण्या पुढील १५ दिवसांत पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीन निर्णय घ्यावा, १५००० रु.मानधन द्यावे तर उर्वरित मागण्यांवर एका महिन्यात निर्णय घ्यावा. शासन स्तरावरून लेखी आदेश मिळेपर्यत ऑनलाईन काम बंद आंदोलन सुरू राहील, अस इशरा उमेद महिला कारंजा तालुका यांनी दिला आहे.

यावेळी अध्यक्ष विनाताई धाये, कोषाध्यक्ष वैष्णवी थोटांगे, सदस्य मलाताई नगरे, किरणताई राऊत, रेखाताई गुंजाटे, मंगला इंगोले, अरुणा इंगोले, मीनाताई थोटांगे या उपस्थित होत्या.

## महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणाचा मुद्दा ऐरणीवर;

# नोटिसांनी व्यावसायिकांची चिंता वाढली!

**●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●**






**मेहकर-मालेगाव महामार्गालगत वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्या दुकानदार, हॉटेल-ढाबेचालक आणि घरमालकांना राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या प्राथमिक नोटिसांचा दणका बसला आहे. महामार्गाच्या हद्दीत परवानगीशिवाय बांधकाम किंवा अतिक्रमण असल्याचे नमूद करत संबंधितांना नोटिसा देण्यात आल्याने व्यावसायिकांमध्ये चिंता निर्माण झाली असून, सात दिवसांची मुदत मिळाल्याने पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांच्या वतीने महामार्गालगत पाहणी करण्यात आली. या पाहणीत महामार्गाच्या हद्दीत परवानगीशिवाय बांधकाम, अतिक्रमण अथवा परवानगीशिवाय प्रवेश आढळलेल्या ठिकाणी संबंधितांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत संबंधितांनी अतिक्रमण स्वतःहून काढून टाकावे किंवा आपले म्हणणे, आक्षेप व आवश्यक कागदपत्रांसह खुलासा सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. मुदतीत कार्यवाही न केल्यास नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे नोटिसीत नमूद करण्यात आले आहे. मेहकर-मालेगाव महामार्गालगत अनेक नागरिक वर्षानुवर्षे दुकाने, हॉटेल, ढाबे आणि इतर छोटे-मोठे व्यवसाय करीत आहेत. या व्यवसायावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने नोटिसांमुळे संबंधित व्यावसायिकांमध्ये चिंता वाढली आहे. दरम्यान, महामार्गाची अधिकृत हद्द नेमकी किती आहे, कोणते बांधकाम महामार्गाच्या हद्दीत येते आणि कोणत्या भागावर अतिक्रमण म्हणून कारवाई केली जाणार, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. महामार्गाची प्रत्यक्ष मोजणी करून हद्द निश्चित करावी, संबंधितांची कागदपत्रे तपासावीत आणि त्यानंतरच पुढील कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सात दिवसांच्या मुदतीनंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून पुढील कोणती कारवाई केली जाते, याकडे मेहकर–मालेगाव महामार्गालगतच्या व्यावसायिकांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रीय शिवचरित्र परिसंवादात प्रा. हरिदास ठाकरे यांचा सहभाग

**●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●**

नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (JNU) येथे दि. २ व ३ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'Life and Legacy of Chhatrapati Shivaji Maharaj – Jayishnu Saviour of Sahishnu Bharat' या राष्ट्रीय परिसंवादात मंगरुळपीर येथील ज्येष्ठ अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते व प्राध्यापक प्रा. हरिदास तुळशीरामजी ठाकरे यांनी सहभाग नोंदवून जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले.

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ आणि श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिसंवादात देशभरातील इतिहास संशोधक, प्राध्यापक, विचारवंत, विद्यार्थी आणि शिवचरित्र अभ्यासक सहभागी झाले होते. परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी ञ्ळ च्या कुलगुरू प्रा. शांतिश्री धुलीपुडी पंडित, भाजपा राष्ट्रीय प्रवक्ते व राज्यसभा खासदार डॉ. सुधांशु त्रिवेदी, तंजावरच्या भोसले घराण्याचे वंशज श्री बाबाराजे भोसले, सरखेल कान्होजी आंग्रे यांचे नववे वंशज श्री रघुजीराजे आंग्रे, तसेच रायगड स्मारक मंडळाचे कार्यवाह व शिवशंभू विचारमंचाचे राष्ट्रीय संयोजक श्री सुधीर थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन दिवस चाललेल्या या परिसंवादात छत्रपती शिवाजी महाराजांचे राष्ट्रकारण, सुशासन, लष्करी रणनीती, आरमार, दक्षिण दिग्विजय, धार्मिक सहिष्णुता, मराठा साम्राज्याचा विस्तार आणि आधुनिक भारतातील शिवचरित्राचे महत्त्व या विविध विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

७

सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# गोगा नवमी उत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा

## माजी आ. दिलीपकुमार सानंदांनी केले शोभायात्रेचे स्वागत, सानंदा मित्र मंडळ व राष्ट्रवादीच्या वतीने शरबत वितरण

प्रतिनिधी ७ सप्टेंबर





**खामगाव :** शनिवार दि.०५ सप्टेंबर २०२६ रोजी शहरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी वाल्मीकी मेहतर व सुदर्शन समाज बांधव भगिणींच्या वतीने श्री जहारवीर बाबा गोगा देवजी नवमी उत्सव भक्तिभावपुर्ण व हर्षोल्हास वातावरणा उत्साहात साजरा करण्यात आला.यानिमित्त सतीफैल भागातुन मानाची छडी व शंकर नगर भागातुन मंडळाकडुन शहरातुन शोभायात्रा काढण्यात आली.या शोभायात्रेचे एकबोटे चौक येथे आगमन झाले असता राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा,माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा यांनी शोभायात्रेचे स्वागत करुन गोगाजी महाराजांच्या पवित्र छडीचे दर्शन घेतले व वाल्मीकी मेहतर समाज व सुदर्शन समाज बांधवांना गोगानवमीच्या शुभेच्छा दिल्या. गोगानवमी निमित्त समाज बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. हा महिना वाल्मीकी मेहतर समाज बांधवांसाठी अत्यंत पवित्र महिना असतो. संपुर्ण महिना भर उपवास करुन ईश्वराची आराधना केली जाती. श्री गोगाजी महाराज जयंतीच्या पावन पर्वावर दरवर्षी शंकर नगर,बाळापुर फैल,सतीफैल यासह इतर भागातुन वाल्मीकी समाज बांधवांच्या वतीने भव्य शोभायात्रा काढण्यात येतात.या शोभायात्रेमध्ये वाल्मीकी समाजाचे प्रतिष्ठीत नागरिक,महिला भगिणी हजारोंच्या संख्येने सहभागी होत असतात.शोभायात्रा खामगांव शहरातील विविध मार्गाने मार्गक्रमण करीत एकबोटे चौक येथे आली असता सानंदा मित्र मंडळ व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शोभायात्रेमध्ये सहभागी झालेल्या शेकडो भाविकांना शरबतचे वितरण करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख,खामगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने,तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, शहर उपाध्यक्ष नरहरी टिकार गुरुजी, संजुभाऊ शर्मा, केशव कापले,शारदाताई शर्मा,श्याम मोरे,अशोकबाप्पु देशमुख,डॉ. आकाश इंगळे,सत्तु शर्मा, संतोष अटोळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# शहरात कावडयात्रांचा माहोल, मिरवणुकांनी नगरी दुमदुमली



प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**खामगावः** श्रावण महिन्याच्या अखेरच्या सोमवारी आज खामगाव शहरात भव्य कावड यात्रांचा उत्साह पाहायला मिळणार आहे. पूर्णा, तापी नदीचे जल घेवून त्या येत आहेत. विविध कावड मंडळांच्यावतीने काढण्यात येणाऱ्या कावड यात्रा नांदुरा रोडने सुटाळा पूलाजवळून वाजतगाजत शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करणार असून, या मिरवणुकांमुळे संपूर्ण शहरात दणदणाटसह माहौल निर्माण होणार आहे.

खामगाव शहर तसेच शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून विविध कावड मंडळांच्या वतीने यात्रांचे आयोजन करण्यात आले आहे. सुटाळा बु., श्रीहरी लॉन्स तसेच गौरव हॉटेल परिसरातून विविध कावड यात्रांना सुरुवात होणार आहे. ढोल-ताशांचा गजर, डीजेच्या तालावर शिवभक्तांचा उत्साह आणि 'हर हर महादेव' च्या जयघोषाने शहर दुमदुमणार आहे. श्रावण महिन्याच्या अखेरच्या सोमवारी कावड यात्रांद्वारे आणण्यात आलेल्या तापी, पूर्णाच्या पवित्र जलाने शहरातील विविध महादेव मंदिरांमध्ये जलाभिषेक करण्यात येणार आहे. त्यामुळे कावडधारकांसह शिवभक्तांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे. दरम्यान कावड यात्रांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाच्यावतीने शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# इसरुळ परिसरात बिबट्याची दहशत

इसरुळ : चिखली तालुक्यातील इसरुळ परिसरात अनेक महिन्यांपासून बिबट्याचा वावर असून दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. येथील शेतकरी ज्ञानेश्वर अवचितराव भुतेकर यांच्या शेतातील गायींच्या गोठ्याजवळ ५ सप्टेंबर रोजी बिबट्याने पाळीव कुत्र्यावर हल्ला करुन त्याला ठार केल्याचे वनविभगाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत आढळून आले.

# शेगाव येथील श्रींच्या मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**शेगाव :** श्री संत गजानन महाराज संस्थान मध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही ४ ऑगस्ट श्रावण कृ ८ शुक्रवार रोजी पारंपारिक पद्धतीने उत्साहात ब्रह्म वृंदांच्या मंत्र उपचारात व सनई चौघडयांच्या निनादात गुलाब पुष्पांची उधळण करत अनंत कोटी ब्रम्हांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगाव निवासी समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय करीत श्रीकृष्ण जन्मोत्सव भाविक भक्तांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण जन्मोत्सव निमित्त दुपारी ४ ते ५ प्रवचन व भजन रात्री ८.३० ते ९.३० वाजेपर्यंत व रात्री १० ते १२ पर्यंत श्रीहरी कीर्तन झाले . कीर्तनकार श्री प्रमोदबुवा राहाणे, पळशी यांचे किर्तन झाले. शेकडो भाविकांनी त्यांचे कीर्तन श्रवण केले. या वेळी कीर्तनात त्यांनी श्री भगवान श्रीकृष्ण चरित्रावर श्रीकृष्ण जन्मोत्सवा निमित्त त्यांनी कीर्तन केले. या कीर्तनाला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावली होती. त्यानंतर हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव सुशोभित पाळण्यात श्रीकृष्ण नामाचा जयघोष जय गजानन श्री गजानन , श्रीकृष्ण गोविंद



हरे मुरारी हे नाथ नारायण वासुदेव या मंत्राचा नाम जप करत , शंखनाद गोपाळ कृष्ण भगवान की जय करत श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाविक भक्तांनी रांगेत उभे राहून दर्शन घेतले व भक्तांना खोबरा वडी व सुटोळ्याचा प्रसाद वितरण करण्यात आला.

**आकर्षक सजावट**

श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त श्रींच्या मंदिरात ठिकठिकाणी आकर्षक फुलांची सजावट व मंदिर परिसरात केळीचे खांब व आंब्याच्या पानांचे तोरणे लावण्यात आले होते.

# वाणिज्य अभ्यास मंडळाची कार्यकारिणी गठित

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी वाणिज्य अभ्यास मंडळाची कार्यकारिणी निवड प्रक्रिया शुक्रवारी उत्साहात पार पडली. बी. कॉम. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून मागविण्यात आलेल्या अर्जामधून ईश्वरचिठ्ठीच्या माध्यमातून पदाधिकारी व सदस्यांची निवड करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश मायी व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. ऋषिकेश विप्रदास यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. नवनियुक्त कार्यकारिणीत अध्यक्षपदी दिव्या खिरोडकर, उपाध्यक्षपदी कोमल टेकाडे, सचिवपदी राजकन्या गोरले, कोषाध्यक्षपदी प्रतीक भगत, प्रसिद्धीप्रमुखपदी शिवानी ताकोते, उज्वला घुळे व गायत्री मोरखडे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून स्वप्नाली डीवरे, कोमल कापसे, श्रावणी इंगळे, सानिका कड, गौरव करांगळे, आचल शिरेकार, भुनेश्वरी बावस्कार, कोमल नळकांडे व चेतन मुंदडा यांचा समावेश आहे. यावेळी वाणिज्य विभागातील प्रा. सचिन उनडकाट, प्रा. आकाश निलजे, प्रा. विनय उमरकर व प्रा. नीलिमा भोपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालन व आभार प्रा. विनोद बावस्कर यांनी मानले.

# शिक्षक दिनी नवोदयच्या विद्यार्थ्यांमध्ये रमले जिल्हाधिकारी प्रवीण देवरे

## वर्गात जाऊन साधला संवाद; विद्यार्थ्यांसोबत घेतले भोजन

प्रतिनिधी ७ सप्टेंबर




**शेगाव :** पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, शेगाव येथे शिक्षक दिनानिमित्त जिल्हाधिकारी श्री. प्रवीण कुमार देवरे (ढ्ढस्) यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी उपविभागीय अधिकारी, खामगाव श्री. रामेश्वर पुरी उपस्थित होते. शिक्षक दिनानिमित्त इयत्ता बारावीतील विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका पार पाडली. जिल्हाधिकाऱ्यांनी विविध वर्गांना भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच विद्यार्थ्यांच्या बेंचवर बसून अध्यापन प्रक्रियेचे निरीक्षण केले. विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती, जिज्ञासा व विविध स्पर्धांतील उल्लेखनीय कामगिरीचे त्यांनी कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यालयातील ग्रंथालय, वैद्यकीय कक्ष, समुपदेशन व करिअर मार्गदर्शन विभाग तसेच मेसची पाहणी करून समाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे, त्यांनी विद्यार्थ्यांसमवेत भोजन करून त्यांच्याशी अधिक आत्मीयतेने संवाद साधला. याप्रसंगी प्राचार्य श्री. कमलाकर धोपटे, उपप्राचार्य श्री. वैद्य, कार्यालयीन अधीक्षक श्री. शंकर बोकडे, श्री. जी. आर. गांगड, श्री. उज्वल मुकावणे, श्री. मिलिंद जामनेकर, श्री. प्रभास कुमार, श्री. अतुल वैराट, श्रीमती कविता ठाकूर, श्रीमती पुष्पा सोनार, श्री. उमाशंकर तसेच शिक्षक-शिक्षिका व कर्मचारीवृंद उपस्थित होते.

# मलकापुरात चोरीच्या उद्देशाने फिरणारे चौघे संशयित ताब्यात

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**मलकापूर :** शहरातील चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मलकापूर शहर पोलिसांनी रात्र गस्त वाढविली असून, ६ सप्टेंबर रोजी पहाटे संत ज्ञानेश्वर नगर परिसरातून चोरीचा किंवा अन्य दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या फिरणाऱ्या चौघांना ताब्यात घेतले. रात्र गस्तीवर असलेल्या पोलिसांना संत ज्ञानेश्वर नगर येथे चार इसम अंधारात लपून बसल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी पंच व स्थानिक नागरिकांच्या मदतीने पहाटे ४ वाजताच्या सुमारास त्यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने त्यांना पोलीस ठाण्यात आणण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये संजय विकास तायडे (३०), अक्षय मनोहर निशानकर (२९), सचिन सुभाष तायडे (२५) आणि अजय संजय खिरडकर (२१), सर्व रा. मोरझिरा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव यांचा समावेश आहे. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात अपराध क्र. ६५४/२०२६, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहन माछरे आणि पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शुभम बरदाडे यांच्या नेतृत्वाखाली डीबी पथकाने केली.

# गणेशोत्सवासाठी बाजार सजला; बंदी असतानाही कृत्रिम फुले आणि थर्माकोलच्या साहित्याची विक्री!

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**खामगाव :** गणेशोत्सवासाठी सजावटीची लगबग सुरू झाली असून, बाजारपेठेत आकर्षक कृत्रिम फुले, प्लास्टिक झालरी आणि थर्माकोलच्या साहित्याची रेलचेल दिसत आहे; मात्र प्लास्टिक फुलांसह प्रतिबंधित प्लास्टिक सजावटीच्या साहित्याचा वापर आणि विक्रीवर निर्बंध असतानाही त्याची सर्रास विक्री सुरू आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर २५ हजार रुपयांपर्यंत दंड आणि तीन महिन्यांपर्यंत कारावासाची तरतूद असल्याने सजावटीसाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याचे आवाहन केले जात आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठांमध्ये सजावटीच्या साहित्याची विविध दुकाने थाटली आहेत.

कमी किमतीत आकर्षक आणि विविध रंगांमध्ये उपलब्ध होणाऱ्या कृत्रिम फुलांना तसेच प्लास्टिकच्या झालरींना ग्राहकांकडून मागणी होत आहे. घरगुती गणपतीपासून सार्वजनिक मंडळांच्या देखाव्यापर्यंत सजावटीसाठी साहित्याचा वापर केला जातो; मात्र विल्हेवाट लावणे मोठे आव्हान ठरते.दंड आणि शिक्षेची काय तरतूद ?

प्लास्टिक बंदीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर टप्प्यानुसार दंडाची तरतूद आहे. पहिल्या उल्लंघनासाठी ५ हजार रुपये, दुसऱ्यांदा १० हजार रुपये, तर तिसऱ्यांदा २५ हजार रुपये दंड आणि तीन महिन्यांपर्यंत कारावासाची तरतूद लागू होऊ शकते. त्यामुळे विक्रेते तसेच वापरकर्त्यांनी प्रतिबंधित साहित्यापासून दूर राहणे गरजेचे आहे.

**प्रतिबंधित साहित्य विक्रीला आळा घालण्याची गरज!**

बंदी आणि दंडात्मक कारवाईची तरतूद असतानाही बाजारात प्लास्टिकची कृत्रिम फुले, झालरी आणि अन्य सजावटीचे साहित्य खुलेआम उपलब्ध आहे. उत्सवाच्या काळात मागणी वाढत असल्याने विक्रेत्यां कडूनही अशा साहित्याची मोठ्या प्रमाणात विक्री केली जात आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी बाजारपेठेत तपासणी मोहीम राबवून प्रतिबंधित साहित्याच्या विक्रीला आळा घालण्याची गरज आहे.

**प्लास्टिक फुलांत घातक रसायने, आरोग्यावर परिणाम**

कृत्रिम प्लास्टिक फुलांना आकर्षक रंग आणि चमक देण्यासाठी विविध रासायनिक घटकांचा वापर केला जातो. वापरानंतर हे साहित्य कचऱ्यात मिसळते. जाळल्यास धूर व घातक घटक निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्लास्टिक फुलांचा वापर आरोग्यासाठीही धोका निर्माण करू शकतो.

# गुटखा विक्रीची माहिती दिल्याने धमकी; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** गुटखा विक्रीची माहिती बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेला का दिली, या कारणावरून मडाखेड खुर्द येथे वाद झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी ६ सप्टेंबर रोजी महिलेच्या तक्रारीवरून चौघांविरुद्ध जळगाव जामोद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सरिता सुरेश पोहरे (३५, रा. मडाखेड खुर्द) यांचे पती शेतातून घरी आल्यानंतर घरासमोर उभे होते. त्यावेळी रोहन मोहन यादव व अंकुश मोहन यादव यांनी, तुम्ही दुकानात गुटखा विकला जात असल्याची माहिती बुलढाणा एलसीबीला का दिली, असा जाब विचारत शिवीगाळ केली. तसेच डोके तोडून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. सरिता पोहरे या आरोपींना समजावून सांगण्यासाठी गेल्या असता बसंतीलाल मोहन यादव व प्रभुलाल माताफिर यादव हेही तेथे आले. त्यांनीदेखील शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीने या प्रकाराचे मोबाइलमध्ये रेकॉर्डिंग करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी अश्लील शिवीगाळ करून रेकॉर्डिंग केल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. याप्रकरणी ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११:२५ वाजता जळगाव जामोद पोलिस ठाण्यात बीएनएसच्या कलम २९६, ३५२, ३५१ (३) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार अतुल मोहाळे करीत आहेत.

# रणथम येथे एमएसईबीच्या डीपीची तार चोरी करताना दोघे ताब्यात

## दोन अज्ञात साथीदारांचा सहभाग; 5 लाखांचे छोटा हत्ती वाहनासह 5 लाख 6 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**मलकापूर :** तालुक्यातील रणथम गावातील बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर असलेल्या एमएसईबीच्या डीपीची तार कटरच्या सहाय्याने चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणी दोन अज्ञात इसमांचाही सहभाग असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले असून, पोलिसांनी छोटा हत्ती वाहनासह एकूण ५ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत प्राप्त माहितीनुसार, जयदीप पंडीतराव पाटील (वय ५२, रा. रणथम, ता. मलकापूर) यांनी मलकापूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार प्रतापसिंग सुरजसिंग बावरी (वय २०) आणि कपूरसिंग सुरजिसंग बावरी (वय २५), दोघेही रा. म्हाडा कॉलनी, मलकापूर, तसेच त्यांच्यासोबत असलेले दोन अज्ञात इसम हे ६ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास छोटा हत्ती वाहन घेऊन रणथम बसस्थानकासमोरील एमएसईबी डीपीजवळ आले. या संशयितांनी कटरच्या सहाय्याने डीपीची तार कापून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावेळी त्यांच्याकडून अॅल्युमिनियमची तार अंदाजे ५ हजार ५०० रुपये, लोखंडी तार कटर अंदाजे १ हजार रुपये आणि छोटा हत्ती वाहन क्रमांक एमएच-१२-टीव्ही-९०४३ अंदाजे ५ लाख रुपये, असा एकूण ५ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. घटनेनंतर मलकापूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात अप. क्र. १०९/२०२६, कलम ३०३ (२), ३ (५) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस ठाण्याच्या आदेशानुसार बीट पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीप रमेश पवार (ब.नं. ६९६) यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. या प्रकरणात ई-साक्ष करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. सदर गुन्हा ६ सप्टेंबर रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास घडला, तर ७ सप्टेंबर रोजी पहाटे ३.३३ वाजता पोलिसांत दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीप पवार करीत आहेत.

# जुन्या वादातून एकाला मारहाण; महिलेशी गैरवर्तन, तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** तालुक्यातील एका गावात घराबाहेर झालेल्या जुन्या वादातून एकाला लोखंडी अवजाराने मारहाण करून जखमी केल्याची तसेच भांडण सोडविण्यासाठी आलेल्या महिलेशी गैरवर्तन केल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचा भाऊ कामावर जाण्यासाठी घराबाहेर आला असता आरोपी संतोष ताराचंद राठोड तेथे आला. त्याने हातातील पहाटी उपटण्याचालोखंडी चिमटा त्यांच्या भावाच्या डोक्यात मारल्याने ते जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीची पत्नी व तिची देराणी तेथे आल्या. त्यावेळी आरोपी सूरज संतोष राठोड व अजय संतोष राठोड हेही तेथे आले. त्यांनी शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. तसेच अजय याने महिलेशी गैरवर्तन केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी तक्रारीवरून जळगाव जामोद पोलिस ठाण्यात बीएनएसच्या कलम ७४, ७५, ११८(१), ३५२, ११५ (२) व ३ (५) अंतर्गत गुन्हा आहे.

# खामगावात गर्भलिंग निदान होत असल्याची तक्रार; तीन सदस्यीय चौकशी समिती गठित

## सोनोग्राफी सेंटरसह चार ते पाच डॉक्टरांना नोटिसा

प्रतिनिधी ७ सप्टेंबर

**खामगाव :** शहरातील एका सोनोग्राफी सेंटरमध्ये अवैधरीत्या गर्भलिंग निदान केले जात असल्याच्या तक्रारीने खळबळ उडाली आहे. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी वैद्यकीय अधीक्षकांनी तीन डॉक्टरांची समिती नियुक्त केली आहे. समितीने शहरासह परिसरातील चार ते पाच डॉक्टरांना नोटिसा बजावल्याची माहिती आहे. या प्रकरणाशी संबंधित डॉक्टरांचा नेमका काय संबंध आहे, याबाबत त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असून,प्राप्त उत्तरांच्या आधारे चौकशीची पुढील दिशा ठरणार आहे. खामगावातील संबंधित सोनोग्राफी सेंटरमध्ये गर्भलिंग निदानासारखा गंभीर आणि कायद्याने प्रतिबंधित प्रकार सुरू असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. तक्रारीनंतर हे प्रकरण आरोग्य विभागाकडे पोहोचले असून, चौकशी समितीमार्फत तपास सुरू करण्यात आला आहे. प्राथमिक चौकशीदरम्यान हे प्रकरण केवळ संबंधित सोनोग्राफी सेंटरपुरते मर्यादित नसल्याचे समोर आल्याची माहिती आहे. शहर तसेच लगतच्या ग्रामीण भागातील काही वैद्यकीय व्यावसायिकांचा संदर्भ तपासात आल्याने संबंधित डॉक्टरांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

**स्पष्टीकरण मागविले !**

नोटिसीद्वारे प्रकरणा संदर्भातील त्यांची भूमिका आणि संबंधित बाबींवर स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. दरम्यान, प्रकरणातील चौकशी सुरू असून खुलाशांनंतर कार्यवाही केली जाणार आहे.

» चौकशीसाठी तीन डॉक्टरांची समिती नेमण्यात आली आहे. समितीने संबंधित डॉक्टरांना नोटिसा बजावून खुलासा मागविला आहे. यानंतर कार्यवाही निश्चित केली जाईल.

**डॉ. नीलेश टापरे,** वैद्यकीय अधीक्षक,

